# अभ्यंकर कुलवृत्तांत पुस्तकातील संकलित घराणे

*(केवळ पिढी, वंशावळी व व्यक्तिंची नावे विविध घराण्याप्रमाणे संकलित)*

*संकलन:*

*अभ्यंकर मंडळ,*

*(रजि. क्र. २९८८२/ठाणे)*

*वेब साईट :www.abhyankarmandal.com*

# "अभ्यंकर कुलवृत्तांत पुस्तकातील संकलित घराणे"

*(केवळ पिढी, वंशावळी व व्यक्तिंची नावे विविध घराण्याप्रमाणे संकलित करुन सादर)*

## प्रस्तावना

स्व. श्री जनार्दन दत्तात्रय अभ्यंकर(ज.द.), सचिव, अभ्यंकर मंडळ रा. ठाणे यांनी खूप मेहनत घेऊन व स्व:त महाराष्ट्रातील गाव नी गाव पिंजून काढत कुलबांधव/माहेरवाशिणींना भेटून "अभ्यंकर कुलबांधवांची" संपूर्ण माहिती संकलित करुन व त्यास घराण्या प्रमाणे सूचीबद्ध करुन "अभ्यंकर कुलवृत्तांत" प्रकाशित केला. हे महान कार्य त्यांच्या हातून आपल्या कुलदेवतांनी पूर्ण करुन घेतले ही खूप मोठी उपलब्धी आहे. ज.द.नी, आपले "मनोगत" व्यक्त करुन "अभ्यंकर कुलवृत्तांत" याचा उहापोह केला आहे तो इथे आपल्या माहिती करिता देत आहोत. तदनंतर अभ्यंकर कुलवृतांतासाठी प्रा.डॉ. शंकर अभ्यंकर पुणे, यांनी अभ्यंकर उपनामाविषयी, तसेच आपले कुलदैवत, कुलवृतांताचे प्रयोजन, संकल्प या विषयीची माहिती संकलित करून आपल्या माहिती करिता येथे सादर करीत आहोत..

अभ्यंकर कुलवृत्तांत समितीचे अध्यक्ष डॉ. रा. म. अभ्यंकर यांनी चित्पावन ब्राह्मणांचे कुळाचार, बोडण, महालक्ष्मीपूजन, देवदिवाळी तसेच "अभ्यंकर कुलवृत्तांतातील" अभ्यंकर घराण्यांची वंशावळी व व्यक्तिपरिचय, रचना, टीपा व बोधचिन्हे इत्यादिची माहिती विस्तारपूर्वक दिलेली आहे त्याचा समावेश या पुस्तिकेत करीत आहोत.

अभ्यंकर मंडळाचे आता पर्यन्त आयोजित कुलसम्मेलनाची माहिती; अभ्यंकर मंडळाचे देणगीदार सभासदांची माहिती; तसेच सन २०२१ ते २०२६ पर्यन्त कार्यकारी मंडळाची माहिती, मोबाइल क्रमांक इत्यादि आपल्या माहिती करता देत आहोत.

आत्ता पर्यन्त बरेच कुलबंधू-माहेरवाशिणी मंडळाला १९९१ साली प्रकाशित केलेल्या "अभ्यंकर कुलवृतांतची" प्रत मागत असतात. परंतु खेदाने असे सांगावयाचे आहे की मंडळाकडे एकही प्रत शिल्लक नाही. म्हणून मंडळाने "ई-कुलवृतांत" तयार करून घेतला आहे व तो आपल्या gharane.abhyankarmandal.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

बरेच कुलबंधूंना आपले नाव इंटरनेट वर उपलब्ध "ई-कुलवृतांत" कसे शोधावे हा यक्ष प्रश्न त्यांच्या समोर उभा राहतो. या शंकेचे निरसन करण्याकरिता या पुस्तिकेत सविस्तर माहिती दिलेली आहे त्याचा अवलंब करावा व आपले नाव "घराण्यामध्ये" शोधावे. आपणाला असेही सांगावयाचे आहे की ज्या कुलबंधू-माहेरवाशिनींनी आपली माहिती कुलसम्मेलनामध्ये प्रत्यक्ष येऊन वा पत्र द्वारे पाठवली आहे त्यांच्याच "data entry" चे काम पूर्ण झाले आहे. ब-याच कुलबंधू-माहेरवाशिनींनी याकडे दुर्लक्ष करीत सतत आवाहन करून सुद्धा माहिती पाठवली नमल्याने "ई-कुलवृतांत" त्यांचे नावासमोर माहिती रिक्त आहे.

आता मंडळाच्या कार्यकारिणीने "अभ्यंकर कुलवृत्तांतात" दर्शविल्याप्रमाणे विविध घराण्यांची "वंशवेल" संकलित करून या पुस्तिकेच्या माध्यमातून आपणा पर्यंत पोचवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे. तरी आपण आपले नाव या घराण्यात शोधावे व आपल्या घराण्याची वंशवेल download करून त्या विषयीची संपूर्ण माहिती अभ्यंकर वेबसाइट वरील "पीडिएफ कुलवृतांत" वर क्लिक करून शोधावी. माहिती अपूर्ण आढळल्यास मंडळाचे अध्यक्ष यांना ई-मेल nishikant1956@gmail.com (whattsapp no. ९३२३७३८६३१) वा सचिव यांना ई-मेल abhyvivek.62@gmail.com (whattsapp no. ९०९६०८१६९३) वर त्वरित "विहित नमुन्यात" भरून पाठवावी.

# <u>आवाहन</u>

अभ्यंकर मंडळाच्या स्थापने पासून आत्ता पर्यंत एकूण ३० वार्षिक कुलसम्मेलने आयोजित केली असून मंडळाने "अभ्यंकर कुलवृत्तांत" मध्ये दिलेल्या घराण्यांपैकी अनुक्रमे 'सासवणे' येथे १३/११/२००५; 'मालवण' येथे ०१/११/२००९; ; 'गावडे-आंबेरे' येथे २९/११/२०१५ रोजी कुलसम्मेलने यशस्वीरित्या आयोजित केली आहे व त्यास २००हुन अधिक कुलबांधव व माहेरवाशीणींचा प्रतिसाद मिळाला आहे. आपण दिनांक १३ नोव्हेंबर २०२२ रोजी "जांभुळपाडा" येथे कुलसम्मेलन आयोजित करित आहोत व त्यास सर्वांचा चांगला प्रतिसाद मिळेल असा आम्हाला विश्वास आहे.

कार्यकारी मंडळाचा असा मानस आहे की ज्या प्रमाणे "अभ्यंकर कुलवृतांतातील" वरील चार घराण्यांच्या ठिकाणी "अभ्यंकर मंडळाची वार्षिक कुळसम्मेलने" आयोजित करण्यात आली होती त्याच धर्तीवर इतर ठिकाणी सुद्धा स्थानिक कुलबंधू-भगीनींनी स्वत:हून पुढाकार घेऊन वार्षिक कुलसम्मेलन आयोजित करण्यासाठी सहकार्य करावे व स्व. जनार्दन दत्तात्रय अभ्यंकर(ज.द.), चे स्वप्न पूर्ण करावे.


निशिकांत शंकर अभ्यंकर
अध्यक्ष, अभ्यंकर मंडळ, ठाणे

विवेक अभ्यंकर
सचिव, अभ्यंकर मंडळ, ठाणे

# अनुक्रमणिका


| | | पृष्ट क्र. |
|---|---|---|
| १ | स्व. श्री जनार्दन दत्तात्रय अभ्यंकर(ज.द.), सचिव, अभ्यंकर कुलवृत्तांत समिती यांचे मनोगत | १-३ |
| २. | प्रा.डॉ. शंकर अभ्यंकर एुणे, यांचा लेख | ४-९ |
| ३. | डॉ. रा. म. अभ्यंकर, अध्यक्ष, अभ्यंकर कुलवृत्तांत समिती यांचे मनोगत | १०-१६ |
| ४. | अभ्यंकर कार्यकारी मंडळ पदाधिका-यांची नावे, मोबाइल क्रमांक | १७ |
| ५. | विविध ठिकाणी आयोजित वार्षिक कुलसम्मेलनाची माहिती | १८-१९ |
| ६. | अभ्यंकर देणगीदार सभासदांची यादी | २०-२१ |
| ७. | "अभ्यंकर ई-कुलवृत्तांत" विषयी सविस्तर माहिती पत्रक | २२ |
| ८. | अभ्यंकर कुलवृत्तांत पुस्तकातील संकलित घराण्यांचे वंशवेल | |
| | मालगुंड घराणे | २३-३२ |
| | कुर्धे घराणे | ३३-५४ |
| | गावडे-आंबेरे घराणे | ५५-६३ |
| | केळे-मजगांव घराणे | ६४-७० |
| | राजापूर कोंढे घराणे | ७१-७६ |
| | नारिंधे घराणे | ७७-९४ |
| | मालवण देऊळवाडा घराणे | ९५-९७ |
| | सासवणे घराणे | ९८-१०१ |
| | जांभुळपाडा घराणे | १०२-१०६ |
| | महाबळ- अभ्यंकर घराणे | १०७ |

| | |
|---|---|
| अभ्यंकर-नगरकर घराणे | १०८-१०९ |
| सुसेरी घराणे | ११० |
| आरोस घराणे | १११-११२ |
| आंबेडे –नगरकर घराणे | ११३ |
| सोनगाव चिपळूण घराणे | ११४ |
| केळवे माहीम घराणे | ११५ |
| सूटी घराणी | ११६-१२३ |

## मनोगत

माझे मूळ गाव शिरोडा. हे गाव कोंकणात सावंतवाडी जवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यात असून महात्मा गांधींच्या १९३० सालच्या मिठाच्या सत्याग्रहासाठी प्रसिद्ध आहे. तसेच मराठीतील पहिले ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक कै.वि.स.खांडेकर यांनी लिहिलेल्या कथा-कादंबऱ्यात प्रसिद्ध आहे. मी वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत आमच्या या गावी रहात असताना आमच्या अभ्यंकर कुटुंबाशिवाय इतर कुणाही अभ्यंकर व्यक्तीचे नाव ऐकले नव्हते. परंतु १९४८ मधे मॅट्रिकची परीक्षा दिल्यावर मुंबईस पुढील शिक्षणासाठी आणि नोकरीसाठी आल्यानंतर ठाणे येथे एक-दोन अभ्यंकर कुटुंबाची घरे प्रथमच पाहिली. त्यामुळे आपल्या प्रमाणे इतरत्र अभ्यंकर आडनावांचे बंधू असल्याबद्दल फारच आपुलकी वाटली. त्याच सुमारास म्हणजे १९४८ ते १९५५ या काळात अनेक आडनावांच्या घराण्यांचे कुलवृत्तांत प्रसिद्ध होत होते. त्याची माहिती वर्तमानपत्रातून वाचण्यात येत असे. तसेच मित्रांच्या बोलण्यातही ऐकली होती. अभ्यंकर आडनावाचे लोक फारच तुरळक दिसत. त्यामुळे त्याविषयी कुतूहलही खूप होते. अकारविल्हे अभ्यंकर हे नांव पहिलेच येत असल्यामुळे शाळा कॉलेजमधे परीक्षेच्या वेळी किंवा अन्यत्र इतर अभ्यंकरांची गाठ पडते एवढेच. त्यामुळे अभ्यंकर कुलाविषयी माझ्या मनात असलेली जिज्ञासा जागृत होऊन आपल्या अभ्यंकर कूळातील व्यक्तींची माहिती देणारा असा एखादा कुलवृत्तांत तयार होईल या आशेने मी पहात होतो. परंतु तसा कुलवृत्तांत प्रसिद्ध झाला नाही

पुढे नोकरीस लागल्यावर महाराष्ट्रात व इतर ठिकाणी केलेल्या प्रवासात आणि वास्तव्यात अनेक अभ्यंकर कुटुंबे ठिकठिकाणी रहात असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले. परंतु अभ्यंकर कुलवृत्तांत प्रसिद्ध न झाल्यामुळे त्या सर्वांची माहिती मात्र उपलब्ध झाली नव्हती. सेवानिवृत्त होण्यापूर्वी सेवानिवृत्तीनंतरच्या योजनांची आखणी करताना अशा माहितीचा शोध व मागोवा मी घेत होतो. गेल्या ४० वर्षांत असा अभ्यंकर घराण्याचा कुलवृत्तांत प्रसिद्ध न झाल्यामुळे तो तयार करण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. पूर्वीच्या आंतरिक ओढीमुळे सेवानिवृत्तीनंतर आपणास या कामी काय करणे शक्य आहे, त्याचा विचार करीत राहिलो. पूर्वीपासूनच सामाजिक कार्याची आवड आणि सवय आणि सरकारी नोकरीत असताना किचकट आणि क्लिष्ट काम करण्यामधील अनुभव, अनेक ठिकाणी असलेल्या गृहस्थांच्या ओळखी आणि काही थोर बंधूंच्या कर्तृत्वाबद्दल वाचनात आलेले लेख, पुस्तके इत्यादीमुळे कुलवृत्तांताचे काम आपणच का करू नये, असा विचार मनात येऊन त्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले. पुण्यास गेलो असता तेथील वास्तव्यात या आधीच कुलवृत्तांताचे काम कुणाकडून चालू झालेले नाही ना याची खात्री करून घेतली. त्याचप्रमाणे पूर्वी असा प्रयत्न कोणी केला होता का त्याचीही ज्येष्ठ आणि अधिकारी व्यक्तींकडून माहिती मिळविली. परंतु अशा प्रकारची कोणतीच माहिती अंशतः किंवा पूर्णपणे उपलब्ध नसल्याचे खात्रीपूर्वक समजले. पुणे येथील कै.नी.दा.अभ्यंकर यांनी चिंतामण लक्ष्मण नगरकर व त्रिपुरांतक विनायक अभ्यंकर या दोन व्यक्तींच्या सहाय्याने कुलवृत्तांताविषयी माहिती गोळा करण्याचा प्रयत्न १९४४-४५ साली केला होता हे त्यांचे दि. ४/६/१९४४ चे विनंतीपत्रकावरुन समजले. परंतु त्यावेळी फारच अल्पप्रतिसाद मिळाला आणि ते काम तसेच अपुरे राहिले. त्यासंबंधी कोणतीच खास माहिती उपलब्ध नसल्यामुळे सेवानिवृत्तीनंतर मी हे काम ३-४ वर्षात पूर्ण करण्याची योजना माझे मनात आखली.

ठाणे येथील चार अभ्यंकर बंधूंना ही माहिती व कल्पना सांगून त्यासंबंधी सहकार्य करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे दि. ८ मार्च १९८७ रोजी ॲड. ज. सी. अभ्यंकर यांचे घरी अभ्यंकर कुलवृत्तांतासंबंधी विचार विनिमय करण्यासाठी ठाणे शहरातील १०-१२ अभ्यंकर बंधुंची सभा आयोजित केली. त्या सभेस सात बंधू उपस्थित राहिले होते. कुलवृत्तांत अद्याप प्रसिद्ध न झाल्यामुळे तसा तो तयार करून प्रसिद्ध करण्याविषयीची कल्पना मी मांडली व ती सर्वांस पटली. त्याच सभेत "अभ्यंकर कुलवृत्तांत समिती" स्थापन करण्यात आली आणि त्याप्रमाणे समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ.रा.म.अभ्यंकर, खजिनदार म्हणून ॲड.ज.सी.अभ्यंकर, व चिटणीस म्हणून मी स्वत: आणि

सहचिटणीस म्हणून श्री. अ.रा.अभ्यंकर यांची निवड करण्यात आली. त्याच सभेत मी तयार केलेले विनंतीपत्र व माहिती गोळा करण्यासाठी तयार केलेला फॉर्म सभेने वितरणासाठी मंजूर केला व अशा प्रकारे समितीचे कार्यास सुरुवात झाली. दिनांक ३० मार्च १९८७ रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अध्यक्षांच्या हस्ते माहिती गोळा करण्याविषयी च्या फॉर्म्सच्या वितरणास सुरूवात झाली.

सामाजिक कार्य करीत असताना नेहमी अनुभवास येणारी उदासीनता, विरोध आणि अडचणी लक्षात घेऊन हे कार्य ३-४ वर्षांत पूर्ण करावयाचे असेल तर निरनिराळ्या भागात रहात असलेल्या अभ्यंकर बंधूंशी संपर्क साधण्याच्या आणि त्यांच्या मनांत या प्रकल्पाविषयी रस किंवा आस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प पूर्ण होईपर्यंत कुलबंधूंशी नियमितपणे संपर्क साधणे आवश्यक वाटले. त्यामुळे दर महिन्यास सोयीनुसार ठाणे, मुंबई, पुणे व इतरत्र निरनिराळ्या ठिकाणी समितीच्या सभा आयोजित करण्यात आल्या. त्यामुळे व्यक्तिगत संपर्क, नवीन माहिती आणि नवीन कल्पना यांची भर पडत गेली. माहिती बरोबरच आर्थिक सहाय्यही मिळत गेले. तरीपण या मासिक सभांव्यतिरिक्त मिळालेल्या माहितीचा पाठपुरावा मी जिद्दीने करीत राहिलो. त्यासाठी आतापर्यंत मुंबई, पुणे, औरंगाबाद, अकोला, नागपूर, कुर्धे, मालगुंड, गावडे-आंबेरे, चिपळूण, रत्नागिरी, मालवण, आरोस, नाशिक, डहाणू, सासवणे, पनवेल, बडोदे, इ. ठिकाणच्या जवळ जवळ २५०-३०० कुटुंबांना स्वत: भेटी देऊन माहिती मिळवली. तसेच नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील पुरोहितांच्या चोपड्यांतील लेख व माहिती उतरवून वंशावळीसाठी उपयोग केला. या कामी त्यांचे चांगले सहकार्य मिळाले.

अशा प्रकारे विविध तऱ्हेने आणि विविध माध्यमातून माहिती जमवत असतानाच परस्पर परिचय वाढण्याच्या दृष्टीने समितीचा वर्धापन दिन साजरा करून त्या जोडीला स्नेहसंमेलन भरविण्याची कल्पना मी हिरिरीने मांडली. त्यास माझ्या सहकाऱ्यांचा आणि इतर परिचित बंधूंचा चांगला प्रतिसाद मिळाला, हे सांगण्यास मला अतीव आनंद होत आहे. या योजनेनुसार आतापर्यंत ठाणे येथे तीन, पुणे येथे एक, आणि बडोदे येथे एक अशी पांच संमेलने मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. त्याबद्दल आपला आनंद अनेक बंधूंनी प्रत्यक्ष आणि पत्राने माझेजवळ व्यक्त केला आहे. अशा तीन स्नेह संमेलन प्रसंगी प्रकाशित केलेली स्मरणिकाही अनेकांना आवडली व कार्यास उपयुक्त ठरली

अशा प्रकारे मोठ्या कष्टाने आणि जिद्दीने कुलवृत्तांत ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे उद्दिष्ट साध्य करीत असताना अनेक बरे-वाईट अनुभव मिळाले. अनेक गोष्टी शिकता आल्या हे मी माझे भाग्य समजतो ! कुलवृत्तांत ग्रंथ आज प्रसिद्ध होत असताना हाती घेतलेले कार्य पूर्ण होत असल्याचे समाधान लाभत आहे त्याबद्दल मी अनेक बंधू-भगिनींचा ऋणी आहे ! त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद देणे हे मी माझे कर्तव्य समजतो ! त्याचप्रमाणे या कामी ज्या अनेक व्यक्तींनी हरतऱ्हेने सहाय्य केले प्रोत्साहन दिले म्हणूनच हा ग्रंथ पूर्ण होऊ शकला हे नमूद करावेसे वाटते

प्रथमत: ज्या कुलबंधूंनी आपली माहिती लिहून पाठवली त्यांचे आभार मानणे आवश्यक आहे कारण अशा स्वरूपाच्या ग्रंथ संपादनामध्ये माहिती मिळवणेच फार कठिण काम असते. तसेच ज्या कुलबंधू भगिनींनी भरघोस देणगी पाठवून प्रोत्साहन दिले व नियमितपणे विचारपूस केली त्यांचेही आभार मानणे जरुर आहे. नामोल्लेखच करावयाचा म्हटला तर माहिमच्या श्रीमती मंगलावहिनी अभ्यंकर यांच्या प्रेमळ चौकशीने व प्रोत्साहनपरपत्रासह मिळालेल्या भरघोस देणगीमुळे मला उत्तेजन मिळाले हे नमूद करावेसे वाटते ! तसेच नागपूरचे निवृत्त न्यायमूर्ती श्री.ना.ल.तथा बापूसाहेब अभ्यंकर यांनी सतत पत्राने व समक्ष निरनिराळ्या सूचना करून वेळोवेळी माहितीची कात्रणे पाठविली व अनेक बंधूंची नांवे व पत्ते कळविले. त्याचबरोबर आपुलकीने चौकशी करुन मौलिक सूचनाहि केल्या. तसेच अगदी पहिल्यापासून चर्चा करून माहिती सांगून प्रोत्साहन दिलेले श्री.नारायण महादेव अभ्यंकर, दादर तसेच पुण्याचे श्री.शिवराम सीताराम अभ्यंकर वकील व श्री.रवींद्र हरि अभ्यंकर व श्री.रामभाऊ तथा श्रीनिवास गजानन अभ्यंकर, पुणे यांचे सहकार्य विसरु शकत नाही. पुण्यांत गेल्यावर तेथील व्यक्तींची नावें, पत्ते,

इत्यादि विषयी माहिती सांगणारे माझे व्याही श्री.वासुदेव यशवंत तथा दादासाहेब गद्रे व कुटुंबीय यांचाही उल्लेख करणे जरुर आहे. अभ्यंकरांची एक माहेरवाशीण श्रीमती मीरा मधुसूदन गोगटे मुंबई यानीही भरघोस देणगी देऊन मला खूपच प्रोत्साहन दिले हेंही नमूद करणे जरूर आहे.

सरते शेवटी अभ्यंकर कुलवृत्तांत समितीचे अध्यक्ष डॉ.रामकृष्ण महादेव अभ्यंकर, उपाध्यक्ष प्रा.मा.सी.अभ्यंकर इतर समितीचे सहकारी आणि श्री.अशोक व अरूण भास्कर अभ्यंकर, गिरगांव, मुंबई यांच्या सहकार्यामुळेच मी हे कार्य पूर्ण करू शकलो म्हणून त्यांच्या अविरत सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य मानतो ! अभ्यंकर कुलवृत्तांत प्रथमच तयार होत असल्यामुळे व तो कमीत कमी काळांत तयार व्हावा अशी प्रबळ इच्छा असल्यामुळे मिळालेल्या माहितीच्या आधारे अधिक काळ न घालवितां लवकरात लवकर म्हणजे ३,/३ ॥ वर्षात हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. हा ग्रंथ निर्दोष रहावा म्हणून बरेच प्रयत्न केले आहेत. तथापि त्यात काही दोष राहिले असण्याची शक्यता आहे. वाचक उदारमनाने त्याबद्दल क्षमा करतील अशी आशा बाळगतो.

या ग्रंथासाठी माननीय खासदार श्री विद्याधरजी गोखले, दादर, मुंबई, यांची उद्‌बोधक प्रस्तावना लाभली त्याबद्दल त्यांचे आणि त्यांचे मित्र श्री. श्रीपाद रामचंद्र अभ्यंकर यांचेही आभार मानणे जरूर आहे. डॉ. शंकर अभ्यंकर, पुणे, यांनीही कुलवृत्तांतासाठी एक लेख मोठ्या तत्परतेने लिहून दिला तो अन्यत्र दिला आहे. तो वाचकांस आवडेल असा भरवसा आहे.

श्री. अनिल शाळीग्राम (प्रिंटलेझ, ठाणे) यांनी तत्परतेने अक्षरजुळणी आणि विशेषत: वंशावळीचे तक्ते सुबक तऱ्हेने करून दिले तसेच शमा फाईन आर्टचे मालक श्री. वि. ल. काळे, मुलुंड यांनी उत्कृष्टपणे व वेळेवर छपाई करून दिली, म्हणूनच हा ग्रंथ वेळेवर प्रसिद्ध होऊ शकला. त्याबद्दल त्यांचे ही आभार मानणे आवश्यक आहे.

जोशीवाडा, खो. नं. ११,
लोकमान्य आळी, सात रहाटी विहिरी समोर,
ठाणे–४००६०१
दिनांक–१७ मार्च १९९१

ज. द. अभ्यंकर.

॥श्री॥

# अभ्यंकर कुलवृत्तान्त

प्रा. डॉ. शंकर अभ्यंकर
एम्.ए., एम्.एड्., पी.एच्.डी.
'तृप्तिदीप,' ४१ एल्.आय.सी. कॉलनी,
४७/२ बी. पर्वती,
पुणे - ४११ ००९.

ज्ञानोपासक म्हणून ज्या घराण्याची चिरंतर ख्याती आहे, त्या अभ्यंकरांचा कुलवृत्तान्त प्रसिध्द होत आहे ही गोष्ट गौरवाची आणि अत्यानंदाची आहे.

कुल म्हणजे उत्तम घराणे आणि वृत्तान्त म्हणजे घडलेली गोष्ट अर्थात इतिहास. प्रस्तुत ग्रंथ हा अभ्यंकर घराण्याचा गौरवास्पद इतिहास होय.

अवघे अभ्यंकर, वसिष्ठ कुलोत्पन्न आहेत. कोंकणस्थ ब्राह्मणांचे गोत्रप्रवर्तक म्हणून अत्रि, अंगरस, कश्यप, भरद्वाज, भृगु, वसिष्ठ आणि विश्वामित्र हे सप्तर्षि प्रख्यात आहेत. या सप्तर्षींची एकूण १४ गोत्रे असून ती सात गटात विभागलेली आहेत.

**अत्रि – अत्रि**

**अंगिरस – विष्णुवृद्ध नित्युन्दन**

**कश्यप – काश्यप, शाण्डिल्य**

**भरद्वाज – गार्ग्य, भारद्वाज, व कपि**

**भृगु – जामदग्न्य, वत्स**

**वसिष्ठ – कौण्डिण्य, वासिष्ठ**

**विश्वामित्र – कौशिक, बाभ्रव्य**

यांपैकी अत्रि, कौण्डिण्य, गार्ग्य, जामदग्न्य, बाभ्रव्य व वत्स हे सहा गोत्रीय आश्वलायनसूत्री आहेत. नित्युन्दन हे केवळ हिरण्यकेशी आहेत. उरलेले सात गोत्रीय म्हणजे जामदग्न्य गोत्रीय पंचप्रवरी तर वत्स गोत्राचे काही त्रिप्रवरी आणि काही पंचप्रवरी आहेत. अन्य गोत्रीय त्रिप्रवरी आहेत. अभ्यंकर हे त्रिप्रवरी असून कृष्ण - यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेचे आहेत.

## आद्यपुरुष वसिष्ठ

वसिष्ठ हे ऋग्वेद कालातील महान मंत्रद्रष्टे ब्रह्मर्षि आहेत. वास्तविक ऋषीचे कुळ आणि नदीचे मूळ विचारू नये म्हणतात. परंतु अभ्यंकरांचे आद्यपुरुष वसिष्ठ असल्याने या ऋषीच्या कुळाचा अभ्यास आपल्याला केलाच पाहिजे. ऋग्वेदात ज्या काही महनीय व चिरस्मरणीय अशा प्रख्यात व्यक्तींचा संबंध येतो, त्या सर्वांत महर्षी वसिष्ठांचे स्थान सर्वांत उच्च व श्रेष्ठ आहे. वसिष्ठांच्या कालातील महात्म्यांची नावे पाहिली, तरी मन हर्षनिर्भर होते.




आपल्या मागील व पुढील पिढ्यात देवत्वाला पोचलेल्या महात्म्यांचा गौरव घेऊन वसिष्ठ केंद्रबिंदु झाले आहेत.

अखण्ड व सादर अभ्यासाने आणि दीर्घ तपश्चर्येने वसिष्ठांनी ब्रह्मर्षि पद प्राप्त करून घेतले. तपोनिष्ठ, ज्ञानवरिष्ठ आणि कर्मकुशल म्हणून वसिष्ठांची कीर्ती अवघ्या भारतवर्षात दरवळली.

ऋग्वेदाने वसिष्ठांवर स्तुतिसुमने वारंवार उधळली आहेत.

वसिष्ठ हे वर्णाने गोरे, उजळ आणि तेजस्वी होते. ('श्वित्यंचः'-७-३३-१). मंत्रविद्या आणि यज्ञकर्म दोहोतही वसिष्ठ निष्णात होते. ('द्विबर्हाः'-७-८-६). डोक्यावर ते उजव्या बाजूला चूडा बांधत असत. ('दक्षितस्कपर्दः'-७-३३-१). वसिष्ठांजवळ हजारोंच्या संख्येत गोसंपत्ती होती. ('शतसाः संसहस्रम्' -७-८-६)

वसिष्ठांचे वैशिष्ट्य असे की ब्रह्मज्ञ असूनही ते राजकारण धुरंधर आहेत. जसूथ नावाच्या अत्यंत क्रूर राक्षसाचा त्यांनी अग्नीच्या सहाय्याने पूर्ण निःपात केला.

इन्द्र हा प्रत्यक्ष देवांचा राजा. त्याचे दर्शन होणे महाकठीण. पण वसिष्ठांची तपश्चर्या आणि कर्तृत्वच असे होते की देवेंद्राने प्रसन्न होऊन दर्शन दिले.

'अदृशमृषिभिर्हीन्द्रं सोऽ पश्चत्तपसा पुरा।'

इतकेच काय पण आपल्या तपश्चर्येच्या सामर्थ्यावर वसिष्ठांनी धाता, सविता आणि विष्णु यांना प्रसन्न करून घेतले आणि अन्य कोणत्याही ऋषीजवळ नव्हते असे रथंतर नामक साममंत्र वसिष्ठांनी प्राप्त करून घेतले. ('धातुर्द्युतानात् सवितुश्च विष्णो रथंतरमा जभारा वसिष्ठः'- १०-१८१-१)

वसिष्ठांची कामगिरी किती अलौकिक होती, हे सांगताना ऋग्वेद म्हणतो,

'सुर्यस्येव वक्षथो ज्योतिरेषा समुद्रस्येव महिमा गभीरः।
वातस्येव प्रजवो नान्येथ स्तोमो वसिष्ठा अन्वेतने वः ॥(७.३३८)

असा हा वसिष्ठांचा महिमा सुर्याप्रमाणे स्पष्ट, समुद्राप्रमाणे अगाध व मंत्रसमुदाय वायुप्रमाणे अनुसरण्यास अशक्य असा आहे.

इन्द्रापासून अश्विनीकुमारांपर्यंत सर्व देवांना वसिष्ठांनी तपोबलाने प्रसन्न केले होते. अतिप्रसन्न झालेल्या वरुणाने तर वसिष्ठांना जलविहाराला बरोबर नेले होते. ('आ यद् रुहाव वरुणश्च नावं प्र यत् समुद्रमीरयाव मध्यम्' - ७८८.३)

वसिष्ठांची राजकीय कामगिरीही हिमालयाएवढी प्रचंड आहे.

ऋग्वेदातील उल्लेखाप्रमाणे तृत्सू वा भरतांचा राजा युध्दात पराभूत होऊन देशोधडीस लागला. त्यामुळे तृत्सूंचे राष्ट्रही विपन्नावस्थेच्या गर्तेत फेकले गेले. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वसिष्ठांनी तृत्सूंचे पौराहित्य स्वीकारले आणि तृत्सूंना इंद्राकडून वसाहतीसाठी सुपीक भूमी मिळवून दिली. 'वसिष्ठस्य स्तुवत इंद्रो अश्रोदुरूं तृत्सुभ्यो अकृणोदु लोकम्' (७.३३.५). इन्द्राने भूभाग दिल्यावर पुन्हा एकदा भरपूर श्रम करून वसिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली संपन्नावस्था प्राप्त करून घेतली.

'दण्डा इवेद् गोअजनास आसन् परिच्छिन्ना भरता अर्भकासः ।
अभवच्च पुरएता वसिष्ठ आदित् तृत्सूनां विशो अप्रथन्त ॥'(७.३३.६)

वसिष्ठांच्या राजकीय कर्तृत्वाचा कळस म्हणजे दाशराज्ञ युध्द होय.

अवघ्या भारतवर्षाला ललामभूत झालेली अशी जी ऋषिनामे आहेत, त्यात वसिष्ठांचे नाम अग्रक्रमाने घ्यावयाय लागेल. वसिष्ठांविषयी अभ्यंकरांच्या मनात परमादर आणि नितांत गौरव आहे.

वसिष्ठांचा पराक्रम, कर्तृत्त्व, तपश्चर्या- सगळेच समाजाच्या हितासाठी आणि राष्ट्राच्या उन्नतीसाठी आहे. वसिष्ठांचा हा तेजस्वी वारसा अभ्यंकरांकडून निरंतर वर्धिष्णु होईल, यात संशय नाही.

## सात्विक प्रवाहाचे उपासक

कोकणस्थ ब्राह्मणांच्या घराण्यात अनेक उत्तुंग व्यक्तिमत्त्वे जन्माला आली. भारताला आणि मानव संस्कृतीला गौरव ठरली. लोकमान्य टिळक, न्यायमूर्ति रानडे, इतिहासाचार्य राजवाडे, वासुदेवशास्त्री खरे आणि कित्येक. अभ्यंकरांपैकी अशी नावे अपवादात्मकच दिसतील. त्याला काही महत्वाचे कारण आहे. समाजातील सत्त्वस्थांचे दोन प्रकार असतात. पहिल्या प्रकारातील सत्त्वस्थ हे समाजाभिमुख असतात. कला, साहित्य, राजकारण इत्यादि माध्यमातून आपल्या कर्तृत्त्वाने लोकांना दिपवून टाकतात. समाजाचे नेतृत्त्व करतात. समाजावर आपला ठसा उमटवतात.

सत्वस्थांचा दुसराही प्रकार असतो. या प्रकारातील लोक प्रसिध्दिपराङ्मुख असतात. मात्र समाजाला एक उत्तम अधिष्ठान लाभावे, म्हणून सात्त्विकतेचा एक शाश्वत प्रवाह निर्माण करण्यात हे सत्वस्थ जाणता-अजाणता कार्यरत असतात. ऋषितुल्य चारित्र्याने आचरणाचा मानदण्ड निर्माण करतात. अभ्यंकर हे दुसऱ्या प्रकारात येतात. वेदविद्येसाठी अभ्यंकरांच्या अनेक पिढ्या समर्पित झाल्याचे इतिहास सांगतो. प्रवचनकार, कीर्तनकार, वेदविद्येचे उपासक, दशग्रंथी, घनपाठी या नात्याने अभ्यंकरांची कामगिरी लक्षणीय आहे.

## चित्तपावनांचे गूढ

इतिहासात जे काही अनुत्तरित प्रश्न आहेत, त्यापैकी एक महत्वाचा प्रश्न कोंकणस्थांसंदर्भातील आहे. कोंकणातील ब्राह्मण ते कोकणस्थ ब्राह्मण हे स्पष्ट आहे. पश्चिम किनाऱ्याचा उभ्या पट्टीचा घाटाखालचा मुलुख कोंकण म्हणून ओळखला जातो. कोंकणालाच परशुरामभूमी किंवा अपरान्त असे म्हणतात. कोंकण भूमीचा शोध घेऊन त्या दुर्गम स्थानी मानवसंस्कृतीची बीजे रोवणारा पहिला द्रष्टा महामानव म्हणजे परशुराम. म्हणून या भूमीला परशुराम भूमी असे म्हटले जाते. अपरान्त या शब्दाचे दोन अर्थ आहेत. अपरा म्हणजे पश्चिम दिशा. त्या पश्चिम दिशेचा अन्त म्हणजे अपरान्त भूमी अर्थात कोंकण. अपरान्त शब्दाचा दुसरा अर्थ अधिक लक्षणीय आहे. अपरान्त म्हणजे वेदविद्या. अर्थात वेदविद्येची भूमी म्हणजे कोकण (किंवा अपरान्त). कोंकणस्थ वेदविद्येचे उपासक आहेत.

कोकणात वस्ती केलेल्या वेदोपासक कोंकणस्थाचे चित्तपावन कसे झाले, हे एक मोठे गूढ आहे. इतिहासाचार्य राजवाड्यांपसून आजपर्यंत अनेक संशोधकांनी चित्तपावन संदर्भात अनेक उपपत्ती मांडल्या असल्या तरी कोणतीही उपपत्ती अजून सर्वमान्य झालेली नाही. इजिप्तमधून आलेले ते चित्तपावन, चितास्थानातील म्हणून चित्तपावन, आशियामायनर मधून आलेल्या नॉर्डिकांबरोबरचे ते चित्तपावन, चितास्थानातून परशुरामांनी जिवंत केलेले ते चित्तपावन. ('चितास्थाने पवित्रत्वात् चित्तपावन संज्ञका') चितीसंबधी कृत्य करणारे ते चित्तपावन अशी उपपत्ती मात्र मिळत नाही. वेदविद्येच्या उपासनेमुळे ज्यांचे चित्त पावन झाले आहे, ते चित्पावन असे म्हणणास प्रत्यवाय नसावा.

चित्तपावन हे नाम, प्रसंगी चित्पावन असेही लिहिले जाते. चित्त म्हणजे परब्रह्म. त्या प्ररब्रह्माच्या आत्मसाक्षात्काराने पावन, शुध्द झालेले ते चित्पावन अशी उपपत्ती सांगता येईल.

मात्र 'चित्तपावन' नामाचे गूढ पुर्णतः उलगडलेले नाही, हे मान्य करावे लागेल.

## अभ्यंकर कोण ?

अभ्यंकर हे वासिष्ठगोत्रिय चित्तपावन कोंकणस्थ ब्राह्मण. तथापि अभ्यंकर हे उपनाम कसे सिध्द झाले, हा आणखी एक मोठा प्रश्न आहे. ज्या आडनावाच्या शेवटी 'कर' येते, त्यामुळे स्थलनिर्देश होतो हे स्पष्ट आहे. उदा. पारगावकर, काशीकर, ब्रह्मनाळकर, वाईकर, सोलापूरकर, अशी किती तरी नावे सांगता येतील. पण अभ्यंकर उपनामात मूळ गाव कोणते ? कोंकणांत अभ्यंग असे गाव असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुण्यपत्तनाचे व पुनंक विषयाचे पुणे होऊ शकते. उर्वशी आणि कुमुदवती या नद्या आज उरमोडी आणि कुकडी अशा चमत्कारिक नावाने ओळखल्या जातात. नावांचे असे अपभ्रंश होऊ शकतात. अभ्यंकरांच्या मूळ गावाचा असा अपभ्रंश झालाही असेल.

अभ्यं असे गाव असण्याची शक्यता नाही, अभ्यंङ्ग म्हणजे माखणे, उटी-तेल लावणे (अभ्यङ्गन). ब्राह्ममुहूर्ती अभ्यङ्ग स्नान करणारे ते अभ्यंकर. अभयंकर वा अभयकर ते अभ्यंकर असाही एक विचार प्रवाह आहे. आश्रयाला येणाऱ्या व्यक्तींना वा शरणागताना अभय देणारे अभ्यंकर होत. असे अभय सत्ताधारी व्यक्ती देऊ शकते. तथापि अभ्यंकर सत्ताधीश असल्याचे इतिहास सांगत नाही. मात्र ब्रह्मविद्येने आत्मसाक्षात्कार अनुभवलेली व्यक्ती असे अभय देण्यास समर्थ असते.

विचारान्ती माझे मत असे झाले आहे की अभ्यंकर हे उपनाम 'अभ्यन्तर' वरून आले आहे. अभ्यन्तर हे संस्कृत भाषेतील विशेषण आहे. त्याचे दोन प्रमूख अर्थ आहेत. पहिला अर्थ सलगीचा, जवळ्कीचा स्नेही असा आहे. दुसरा अर्थ अधिक मोलाचा आहे. अभ्यन्तर म्हणजे' निष्णात.' अर्थात वेदविद्येत व आपल्या कर्मात निष्णात ते अभ्यन्तर होत. अभ्यंकर प्रामुख्याने ज्ञानोपासक असल्याने वेदविद्येतील निष्णात म्हणूनच त्यांची परंपरेने ख्याती असली पाहीजे. स्थलपरत्वे, कालपरत्वे अभ्यंकर कुलातील काहीजण अन्य व्यवसायात गेले आणि खोत अभ्यंकर वा ज्योतिषी अभ्यंकर वा सावकार अभ्यंकर अशीही घराणी निर्माण झाली. परंतु व्यवसायातील कर्मकुशलता मात्र राहिली. अभ्यन्तर (अभ्यंकर) मधील 'त' चा 'क' कालाच्या ओघात झाला असावा.

काही अभ्यंकर जोड उपनामाने संबोधले जातात. आमचेच घराणे अभ्यंकर ऊर्फ काशीकर असे ओळखले जाते. आमचे घराण्यातील कुणी पूर्वजांनी काशी-रामेश्वर करून गङ्गा आणली, शिवाय काशीत वास्तव्य करून, उत्तम अध्ययन संपन्न करून मानाची शालही मिळवली असे परंपरेने सांगितले जाते. तशी सनदही आहे. त्यामुळे अभ्यंकर उपनामावर मात्र अधिक प्रकाश पडत नाही.

## जानभट अभ्यंकरांचे कर्तृत्त्व

अभ्यंकरांचा जो इतिहास आज ज्ञात आहे, त्यानुसार शिवाजी महाराजांच्या कालखडांतील– इ.स. १७ वे शतक– जानभट अभ्यंकरांचे कर्तृत्त्व डोळ्यात भरण्यासारखे आहे.

शके १५८६ च्या कृष्णप्रिय मार्गशीर्ष महिन्यात शिवाजी महाराज कारवार-गोमंतक असा प्रवास करुन तळकोंकणातील मालवण बंदरात दाखल झाले. अर्धापाऊण कोसावर समुद्रात असलेले 'कुरटे' बेट त्यांना दिसले. आपल्या सहकाऱ्यांसमवेत त्यांनी 'कुरटे' बेटाची प्रत्यक्ष पाहणी केली. भोवती समुद्र असूनही बेटावरचे पाणी अमृतमधुर होते. शिवाजी महाराज म्हणजे युद्धतंत्राचे सम्राट. त्या बेटावर अजिंक्य असा जलदुर्ग उभा राहू शकेल, हे महाराजांनी जाणले. किल्ला बांधण्यासाठी मुहूर्ताचा चिरा बसवणे आवश्यक होते. त्यासाठी समंत्रक पूजाविधी सांगणाऱ्या वेदसंपन्न उपाध्यायाची निकड भासली. महाराज म्हणाले, 'पेस्तर पूर्ण प्रांत हस्तगत करणे आहे हें कृत्य होतेच आहे. ऐशियास गावीचा उपाध्या असावा.'

मालवणात त्यावेळी वेदशास्त्रसंपन्न जानभट अभ्यंकर व त्यांचे भाचे दादंभट बिन पिलंभट उपाध्ये होते. जानभट हा जनार्दनचा अपभ्रंश असावा. जानभट अभ्यंकरांना शिवाजी राजांचे निमंत्रण आले. राजांची थोरवी जानभट जाणून होते. तथापि कोकणात सिद्दीचा धाक होता. शिवाय आदिलशहाची अनेक ठाणी कोकणात होतीच. आपण शिवाजी राजाला मदत केली, तर अभ्यंकरांच्या घरावरून नांगर फिरेल, अत्याचार– जुलुम होतील, कदाचित् सिद्दीच्या कोपाने बाटवाबाटवीही होईल, याची जाणीव जानभटांना होती. त्यामुळे त्यांनी व्यावहारिक शहाणपणा दाखवून महाराजांच्या सैनिकांना नकार दिला. महाराज विवेकी असल्याने त्यांनी जानभट अभ्यंकरांच्या मनीचे भय जाणले. जानभट येणार नाहीत, हे ओळखून महाराजांनी त्यांना पकडून आणण्यास सांगितले. सैनिकांनी जानभटांना धरून आणल्यावर मात्र महाराजांनी या वेदोनारायणांचा सत्कार सन्मान केला. महाराज बोलले, 'तुम्ही ब्राह्मण. या जागी सुखरूप राहणे. काही शंका मनामध्ये न धरणें. प्रांतमजकूर (तळकोकण) हस्तगत जाहलाच आहे. काही किंचित अद्लशाई कुडाळपासून मामले फोंड्यापर्यंत ठाणी आहेत ती दहशत खाऊन जातील. राज्य प्रबळ होत आहे. चिंता न करणे.'

मग मात्र जानभट अभ्यंकरांनी आपली अवघी पुणाई सिंधुदुर्गाच्या बांधणीत ओतली. श्रीनृप शालिवाहन शके १५८६ मार्गशीर्ष वद्य द्वितीया (दि. २५ नोव्हेंबर १६६४) या मंगल दिवशी वेदोनारायण जानभटांनी वेदमंत्रघोषास प्रारंभ केला. यथावकाश सिंधुदुर्गाची उभारणी झाली आणि महाराजांच्या आज्ञेनुसार जानभट अभ्यंकरांना या जलदुर्गाचे वंशपरंपरागत कायमचे उपाध्यायपण मिळाले. मानव संस्कृतीला कलाटणी देणारा उत्तुंग कर्तृत्वाचा इतिहास रामकृष्णानंतर शिवाजी महाराजांनी निर्मिला. त्यातील खारीचा

का होईना पण विधायक, पुण्यदायी वाटा अभ्यंकरांचा आहे, हे स्मरूनही धन्यता वाटते.

## अभ्यंकरांचे कुलदैवत

अभ्यंकरांचे कुलदैवत म्हणून विविध देवदेवतांचा निर्देश येतो. कुर्ध्याचे महाविष्णु व महागणपति, कोल्हापूरची महालक्ष्मी अंबाबाई, अंबेजोगाईची योगेश्वरी वा जोगेश्वरी वा जोगाई, गुहागरचा व्याडेश्वर, कोकणचा आदित्यनाथ इत्यादि दैवते अभ्यंकर कुलाच्या देव–देवता म्हणून पूजल्या जातात. वरवर नावांची भिन्नता असली, तरी 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति', या ऋग्वेद वचनाप्रमाणे चित् तत्त्व एकच आहे, हे ज्ञानोपासक अभ्यंकरांना वेगळे सांगावयास नकोच.

वर उल्लेख केलेली सर्वच दैवते विख्यात असली, तरी शेवटच्या दोन विशेषकरून आदित्यनाथ– दैवतावर थोडा प्रकाश टाकणे अगत्याचे आहे. व्याडेश्वर हे शंकराचेच रूप आहे. व्याडेश्वर म्हणजे क्रूरांना शासन करणारा. तळकोकणात वस्ती करणाऱ्यांना अभय देणारे परमेश रूप म्हणजे व्याडेश्वर. वैवस्वत मन्वंतरातील मित्र, अर्यमा, भग, वरुण, दक्ष आणि अंश या देवतासमूहाला आदित्य अशी संज्ञा आहे. ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडलात (२७.१, ३ व ४) आदित्याचे विशेष वर्णन आहे.

अंश, भग, धाता, इंद्र, विवस्वान्, मित्र, वरुण आणि अर्यमा या आठ अदितिपुत्रांनाही आदित्य अशी संज्ञा आहे. शतपथ ब्राह्मणात (११.६.३.८) अंशुमान्, अर्यमा, इंद्र, त्वष्टा, धाता, पर्जन्य, पूषा, भग, मित्र, वरुण, विवस्वान् व विष्णु अशा बारा आदित्यांचा उल्लेख असून त्यात विष्णु सर्वश्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे. बारा आदित्य हे बारा महिन्यांची प्रतिकेच आहेत. अर्थात आदित्यनाथ हे शिवाचे रूप असल्याने या दैवतात हरिहर संगमच आहे.

## अभ्यंकरांचा कृष्ण यजुर्वेद

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे हिंदु संस्कृतीचे महाप्राण आहेत. वेद अपौरुषेय अर्थात् ईश्वरप्रणित मानले जातात. 'येन यस्मिन् वा सत्यज्ञानं स वेदः', अशी वेदाची व्याख्या करता येईल. वेद यज्ञपुरुषासून निर्माण झाल्याचे ऋग्वेद म्हणतो. (१०.९०.९) शतपथ ब्राह्मणात (११.५.२.व ३) 'अग्नेऋग्वेदो वायोर्यजुर्वेदः सूर्यात्सामवेदः' असे म्हटले आहे. अर्थात् वायुतत्त्वापासून यजुर्वेदाची निर्मिती झाली. विष्णुपुराणातील कथेप्रमाणे वेदव्यासांनी वेदाचे चार भाग केले. त्यातील यजुर्वेद त्यांनी वैशंपायन या शिष्याला शिकविला. वैशंपायनांकडून तो याज्ञवल्क्यांकडे आला. पुढे काही कारणामुळे या दोघांमध्ये वैमनस्य आल्यामुळे वैशंपायनांनी याज्ञवल्क्यांकडून वेद परत मागितला. याज्ञवल्क्यांनी तो ओकून टाकला व सूर्योपासनेने तो पुन्हा शिकून घेतला. परत केलेला वेद हा धगधगीत निखाऱ्याप्रमाणे असल्यामुळे वैशंपायनांच्या शिष्यांनी तित्तिर पक्ष्यांचे रुप घेतले. कारण केवळ तित्तिर पक्षीच निखारे खाऊ शकतात. या शिष्यांनी तित्तिर पक्ष्यांचे रुप घेऊन वेद ग्रहण केला. म्हणून या वेदाला तैत्तिरीय संहिता असेही नाव पडले. यालाच कृष्ण यजुर्वेद अशीही संज्ञा आहे. उलट याज्ञवल्क्यांनी सूर्यापासून वेद मिळविल्याने तो शुक्ल यजुर्वेद वा वाजसनेयी संहिता झाला.

प्रत्येक वेदाचे दोन भाग असतात. संहिता आणि ब्राह्मण. यजुर्वेदाची तैत्तिरीय आणि शतपथ अशी दोन अलौकिक ब्राह्मणे आहेत. ऋग्वेद हा हौत्रवेद तर यजुर्वेद हा आध्वर्यवेद आहे. या वेदाच्या संहितेतील मंत्र पद्यमय नसून गद्यात्मक आहेत. यालाच 'यजुः' असे म्हणतात. तैत्तिरीय संहितेत ४४ प्रपाठक, ६५१ अनुवाक व १ लक्ष दहा सहस्राहून अधिक पदसंख्या आहे. तैत्तिरीय ब्राह्मणात ३ कांडे, २८ प्रपाठक व ३३९ अनुवाक आहेत. तैत्तिरीय आरण्यकात १० प्रपाठक व अनेक अनुवाचक आहेत. यांपैकी ७ ते ९ प्रपाठकात शिक्षावल्ली, ब्रह्मवल्ली आणि भृगुवल्ली हे अनेक अनुवाक वर्ण्यविषय आले आहेत. यातील तत्त्वज्ञानाची उंची व खोली अतुलनीय आहे.

तैत्तिरीय संहिता हा वृक्ष, उपनिषदांचे रहस्य हे त्याचे मूळ, ऋचा ही पाने, यजु ही त्याची फुले व प्रवाल व यज्ञकर्म हे वृक्षाचे उत्तम फल होय. तैत्तिरीय, कठ, ईशावास्य, बृहदारण्यक ही यजुर्वेदाची उपनिषदे म्हणजे तत्त्वज्ञानाची भांडारे आहेत. तैत्तिरीयाचा शांतिमंत्र 'ॐ शं नो मित्रः शं वरुणः—' असून कठोपनिषदचा 'ॐ सह नाववतु_' हा शांतिमंत्र दैनंदिन पाठात आहे. मानवी जीवनाचे अप्रतिम रुपक मांडणारा 'आत्मानं रथितं विद्धि_' हा मंत्रही याच उपनिषदातील होय. ईशावास्योपनिषदाने आत्मा व बाह्य विश्व एकच असून तेच ब्रह्मतत्त्व, जीवनाचे अंतिम लक्ष्य तेच असल्याचे पहिल्या श्लोकानेच– 'ईशावास्यमिदं सर्वं_' –सांगितले आहे. या उपनिषदाचा शांतिमंत्र 'ॐ पूर्णमदः पूर्णमिदं_' म्हणजे अव्दैताचे सारच होय. भृगु– नचिकेत कथा, मैत्रेयी उद्दालक इत्यादिंबरोबरचा याज्ञवल्क्य संवाद हे वरील उपनिषदांमधूनच आले आहेत. वरीलपैकी तैत्तिरीय व कठ ही दोन्ही उपनिषदे कृष्ण यजुर्वेदाची आहेत.

## कुलवृत्तान्ताचे प्रयोजन

प्रस्तुत ग्रंथ हा अभ्यंकर कुलाबाहेर वाचला जाण्याची शक्यता फार कमी आहे. त्यामुळे लाखभर रुपये खर्चून एवढा ग्रंथ सिद्ध करण्याचा खटाटोप तरी कशासाठी अशी शंका मनात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

हा ग्रंथ म्हणजे अभ्यंकरांचा सांस्कृतिक इतिहास आहे. अभ्यंकरांचा कुललौकिक वर्धिष्णु करणारे लेखक, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर, दशग्रंथी, अभ्यासक, कवि, उपासक, समाजधुरीण–सगळेजण या ग्रंथात एकत्र आले आहेत. अभ्यंकरांची ज्ञात–अज्ञात व्यक्तिमत्त्वे या ग्रंथात परस्परांना आत्मीयतेने भेटली आहेत. आपले घराणे, आपले पुराण-पुरुष, आम्ले संस्कार, आपले कुलाचार यांची सुंदर रंगावली या ग्रंथात उमटली आहे. 'आम्ही कोण ?' हा पिढ्या न् पिढ्यांचा प्रश्न या ग्रंथाने सोडवला आहे. आपली कुलदैवते, आपला आद्यपुरुष आपले वंदनीय ग्रंथ आणि महापुरुष यांची रहस्ये या ग्रंथाने सहज उलगडली आहेत. भूत दर्तमानांचा इथे समन्वय झाला असून भविष्याची वाटचालही कुलवृत्तान्ताने प्रकाशित केली आहे. अनेक पिढ्यांचे अंतर या ग्रंथाने नाहीसे केले आहे.

मुळात अभ्यंकर फार नाहीत. त्यांना एकत्र बांधणारा भावनिक धागा म्हणजे हा कुलवृत्तान्त. अभ्यंकरांचा अवघा सांस्कृतिक इतिहास इथे निःसंदिग्धपणे साकारला आहे. जीवनाची विविध अंगे संपन्न करणारा पराक्रम या कुलवृत्तान्तात स्वच्छ उमटला आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, सामाजिक, धार्मिक– असा हा अभ्यंकरांचा बहुरंगी आलेख अप्रस्तुत कोण म्हणेल ?

## संकल्प

कुलवृत्तान्त सिद्ध करणे हे शिल्प घडवण्याइतके कठीण ! वर्षानुवर्षे अत्यन्त निःस्पृहपणे, चिकाटीने, अभ्यासपूर्वक या कार्याचा पाठपुरावा करावा तेव्हा कुठे कुलवृत्तान्त साकारायचा ! अभ्यंकर कुलवृत्तान्त साकारला, पुढे काय ? हा ग्रंथ सिद्ध झाला म्हणजे अभ्यंकर कुलाच्या कार्याचा प्रारंभ झाला असे म्हणावे लागेल. आता पुढील कार्यांना गती यावी—

१) अभ्यंकर कुलाचे वैभवशाली प्रतिष्ठान स्थापन व्हावे.
२) वर्षातून किमान एक वेळेस तरी अभ्यंकरांचा मेळावा व्हावा.
३) अभ्यंकरांच्या वसिष्ठ प्रतिष्ठानाने कुलातील बुद्धिमान विद्यार्थी प्रकल्पक इत्यादींना भरघोस मदत करावी,
४) प्रतिष्ठानची स्वतंत्र इमारत उभी करून ज्ञान– विज्ञान संपन्न करणारे उपक्रम राबविण्यात यावेत.
५) पाच वर्षातून एकदा अभ्यंकरांचे आंतरराष्ट्रीय संमेलन व्हावे,
६) कुलदैवतांच्या गावी अभ्यंकरांसाठी विश्रामधामे बांधण्यात यावीत.

## समारोप

हा सिद्ध कुलवृत्तान्त अभ्यंकर कुलप्रदीपांच्या हाती दिला आहे आणि कुलप्रदिप हे उज्ज्वल प्रकाश देणाऱ्या दिव्याहून थोर असतात.

दीपाः स्थितं वस्तु विभावयन्ति कुलप्रदीपास्तु भवन्ति केचित् ।
चिरव्यतीतानपि पूर्वजान्ये प्रकाशयन्ति स्वगुणप्रकाशात् ॥

दिवे आपल्या भोवतीच्या वस्तूंना उजळतात, पण कुलदीपक मात्र–ते दुर्मिळ असले, तरी--आपल्या स्वगुणप्रकाशाने स्वतःचे, कुलाचे आणि पूर्वजांचे नावही उज्ज्वल आणि धन्य करतात.

अभ्यंकरांचे कुलदीपक आपल्या कुलाची ज्ञानाची कावड भरभरून पुढे नेवोत आणि आपल्या कर्तृत्वाने आधीच उज्ज्वल असलेले घराणे अधिक उज्ज्वल करोत, हीच प्रभुचरणी प्रार्थना !

–डॉ. शंकर अभ्यंकर

मार्गशीर्ष शु ॥११, शके १९१२
(मोक्षदा एकादशी, गीताजयंति)
२८ नोव्हेंबर, १९९०

## चित्पावन ब्राह्मणांचे काही कुलाचार

प्रत्येक कुलात पिढ्यान्‌पिढ्या निरनिराळे कुलधर्म व कुलाचार पाळले जातात. पूर्वजांनी घालून दिलेल्या परंपरांचे पालन आजवर लोक करीत आले आहेत. परंतु आधुनिक कालात या परंपरांचा झपाट्याने लोप होत चालला आहे. या कुलाचारपालनामुळे आपला कुलस्वामी, आपली कुलदेवता, आपली ग्रामदैवते यांचे स्मरण होते; आपला मूळ गाव आठवतो. आपल्या कुलातील मंडळींचे स्थलांतर केव्हा, कोठे, कसकसे होत गेले याचाही बोध होतो.

या सर्व आठवणी जागृत ठेवणे हासुद्धा या कुलाचारांचा हेतू आहे. भावी पिढ्यांतील स्त्री-पुरुषांना मार्गदर्शन व्हावे या हेतूने बोडण, महालक्ष्मीपूजन आणि देवदिवाळी या खास चित्पावन ब्राह्मण कुलात पाळल्या जाणाऱ्या कुलाचारांची माहिती येथे देत आहोत. सदर लेख गाडगीळ कुलवृत्तांता मधून घेतला आहे.—**संपादक**

### बोडण

बोडण हा शब्द 'वर्धन' या शब्दापासून बनलेला आहे. कुटुंबात वृद्धी झाल्यावर म्हणजेच मंगलकार्य व प्रसूती झाल्यावर बोडण भरण्याची चाल आहे. घरात गाय व्यायली म्हणजेही बोडण भरण्याची चाल काही कुटुंबात आहे. काही कुटुंबातून दरवर्षी बोडण भरतात.

गौरीहराचे वेळी पूजिलेली अन्नपूर्णा देवी (पार्वती) नववधू आपल्याबरोबर पतिगृही नेते. ही देवी कुलवधूवर कृपादृष्टी ठेवून तिची संकटे निवारते; तसेच तिचा संसार वाढीस लावते. म्हणून तिच्यापासून वंशवृद्धी झाल्यावर त्याची सांगता करण्यासाठी बोडण भरण्याची चाल पडली आहे.

घरातील मुख्य सुवासिनी स्त्री किंवा नववधू, कुटुंबाबाहेरच्या तीन पुत्रवती सुवासिनी व एक कुमारिका अशा पाच स्त्रियांनी मिळून बोडण भरावयाचे असते. सुवासिनी घरी आल्यावर तुळशी-वृंदावनाजवळ उभ्या करून तुळशीची पूजा करण्यात येते. नंतर सुवासिनी व कुमारिका यांच्या पायावर दूध-पाणी घालून व औक्षण करून त्यांचे स्वागत केले जाते.

प्रथम गाईच्या शेणाने जागा सारवून, त्यावर बोडणाची रांगोळी घालून त्यावर पाट ठेवतात. अक्षता ठेवून त्यावर परात ठेवतात. देवी अन्नपूर्णेची पंचामृती पूजा करतात. घरची मुख्यसुवासिनी देवीला बसण्यासाठी व टेकण्यासाठी कणकेची बैठक व लोड (पाटा-वरवंटा) तयार करून ते परातीत ठेवतात. त्यावर देवीची स्थापना केली जाते. तिला कणकेचे अलंकार वाहतात.

नंतर देवीची मूर्ती ताम्हणात घेऊन पंचामृत पूजा करून तिला सहा नैवेद्य अर्पण करतात. नैवेद्य पुरणाचे करतात. तसेच त्यामध्ये भजी, वडे इ. तळलेले पदार्थही असतात. पाच नैवेद्य देवीपुढे परातीत ठेवतात व एक नैवद्य परातीबाहेर दाखविला जातो. हा नैवेद्य कुमारिकेने भोजनास घ्यावयाचा असतो. नैवेद्य दाखवून झाल्यावर कणकेचे बनविलेले पाच दिवे लावून सुवासिनी व कुमारिका देवीची पूजा करतात, भंडारा वाहतात आणि देवीची आरती करतात.

हे पाच दिवे पूर्वी परातीत ठेवलेल्या पाच नैवेद्याचे पानावर ठेवतात. नंतर प्रत्येक सुवासिनी पंचामृत घालतात. ओंजळीतील दूध त्या सुवासिनी दिव्यांवर सोडतात. दीप शांत होतात. मग देवीवर आणखी दूध व दही घालून सर्व त्यातील देवीसह परातीत एकत्र 'बोडण' म्हणून कालवितात.

'देवी तृप्त झाली का?' असे त्यातील कुमारिकेस विचारतात. कुमारिकेने 'होय' असे म्हणेपर्यंत त्यात आणखी दूध-दही घालून 'बोडण' कालवितात. घरच्या सुवासिनीने पूर्व दिशेकडे तोंड करून पूजेला बसावे. कुमारिकेला तिच्या उजव्या बाजूस बसवावे. देवी तृप्त झाल्यावर त्या बोडणाचा काही भाग देवीचा प्रसाद म्हणून कुमारिकेच्या हाताने कुटुंबातील सर्व मंडळीस अंगारा म्हणून लावतात.

नंतर बोडणातील देवी बाहेर काढून ती स्वच्छ धुऊन, पुसून तिच्या तोंडाला साखर लावून ती परत घरच्या देवात नेहमीच्या जागी ठेवून देतात. कालविलेल्या बोडणाचा कोणताही भाग अपवित्र ठिकाणी पडू नये म्हणून

सुवासिनी आपले हात त्याच परातीत, हाताला पुरण लावून स्वच्छ धुतात, आणि नंतर ते सर्व कालवण गाईला घालतात किंवा वाहत्या पाण्यात विसर्जित करतात. नंतर सुवासिनींची ओटी भरून सर्व मंडळी भोजनास बसतात.

गर्भवती स्त्रीने या विधीत भाग घ्यायचा नसतो. चैत्र व पौष महिन्यात बोडण भरीत नाहीत. श्रीदेवीचे कृपेने वंशवृद्धी होऊन कुटुंबाची वाढ झाली असे मानून तिचे पूजन करून तिला संतुष्ट करणे हा या कुलाचाराचा हेतू आहे.

नैवेद्य :- १) भक्ष्य — लाडू, पोळी इ. २) भोज्य — गूळभात, खिचडी इ. ३) लेह्य - पंचामृत, लोणचे इ. ४) चोष्य — चावून खाता येतील असे पदार्थ ५) पेय — दूध, दही इ.

## महालक्ष्मीपूजन

विवाहापासून पाच वर्षापर्यंत नववधूने हे व्रत पाळावयाचे असते. अश्विन शुद्ध अष्टमीला सकाळी प्रथम खड्यांच्या देवीची पूजा करतात. खड्यांची संख्या आपापल्या विवाहवर्षाप्रमाणे १ ते ५ पर्यंत घ्यावयाची असते पूजेच्या वेळी दूर्वांचा एक तंतू सोळा गाठींचा व दुसरा रेशमाचा एक तंतू घेतात. रेशमाच्या तंतूला विवाह-वर्षाच्या संख्येइतक्या गाठी मारायच्या असतात.

खड्यांच्या देवीबरोबर या दोन्ही तंतूचीही पूजा करतात. पूजेनंतर रेशमी तंतू मनगटात बांधतात. दुपारी तांदळाच्या उकडीचा देवीचा मुखवटा बनवून श्री. महालक्ष्मीची स्थापना करतात. देवीपुढे सकाळी पूजन केलेल्या खड्यांच्या देवी आणि दूर्वांचा तंतू ठेवतात. सायंकाळी देवीला मूर्तीचा आकार देऊन वस्त्रालंकारांनी तिला सजवितात. नंतर देवीची पूजाअर्चा करून आरती करतात. आरतीनंतर घागरी फुंकण्याचा कार्यक्रम सुरू होतो. घागरी फुंकण्यामुळे प्राणसंचार होऊन देवी सचेतन होते अशी समजूत आहे. त्या वेळी काही स्त्रियांच्या अंगात देवीचा प्रादुर्भाव होऊन त्या घुमू लागतात.

तेथे जमलेल्या सुवासिनींपैकी कोणी प्रश्न विचारून देवीचा कौल घेतात. घागरी फुंकण्याचा कार्यक्रम संपल्यावर पहाटे देवीची आरती केली जाते. नंतर मनगटातील रेशमी तंतू देवीला वाहून हा विधी संपतो.

काही कुटुंबातून महालक्ष्मीची पूजा आपल्या घरी करीत नाहीत. ज्या ठिकाणी ही पूजा केली जाते, त्या ठिकाणी स्वतः जाऊन ही पूजा करतात. त्यासाठी निमंत्रणाची आवश्यकता नसते. सर्व साहित्य व दक्षिणा बरोबर न्यावयाची असते. दुपारचे भोजनही तेथेच करतात. म्हणून त्यासाठी लागणारा शिधा घरून न्यावयाचा असतो.

गर्भवती स्त्रियांनी ह्या पूजनात भाग घ्यावयाचा नसतो. श्री महालक्ष्मीच्या कृपाप्रसादाने नववधूला व तिच्या कुटुंबियांना ऐश्वर्य प्राप्त व्हावे यासाठी या कुलाचाराचा हेतू आहे.

## देवदिवाळी

मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेला देवदिवाळी असे नाव आहे. "मासानां मार्गशीर्षोऽहम् ।" असे भगवान श्रीकृष्णांनी गीता अध्याय १० ।३५ मध्ये सांगितले आहे. सर्व महिन्यात मार्गशीर्ष हा महिना श्रेष्ठ. त्याला विष्णुमास असेही नाव आहे. प्राचीन काळी मार्गशीर्ष - मासाने वर्षारंभ होत असे. चित्तपावन ब्राह्मणांखेरीज मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेचे महत्त्व अन्य कोणीही मानीत नाहीत.

या दिवशी सर्व चित्तपावन ब्राह्मण कुटुंबातून आपला कुलस्वामी, कुलदेवता व ग्रामदेवता यांना महानैवेद्य अर्पण करण्याचा कुलाचार पाळला जातो. त्याला 'नैवेद्य घालणे' असेही म्हणतात. यावेळी मुख्य देवतांचे नैवेद्य स्वतंत्र पानावर व ग्रामदेवतांचे नैवेद्य त्यांच्या संख्येइतक्या भाताच्या मुदा व पक्वान्ने एका पानावर याप्रमाणे मांडतात. वडे-घारगे (भोपळ्याचे गोड वडे) हे मुख्य पक्वान्ने यावेळी करतात.

सर्व देवतांना एकाच वेळी नैवेद्य दाखविण्यात येतो. कुलदेवतेचा नैवेद्य घरातील मंडळी सेवन करतात. इतर ग्रामदेवतांचे नैवेद्य बहुधा गाईला घालतात किंवा गुरवाला अथवा गोरगरिबांना देतात. देवदिवाळीला हे जमले नाही तर पुढे चंपाषष्ठीपर्यंत सोयीच्या अशा कोणत्याही दिवशी नैवेद्य घालावेत.

# चित्पावन अभ्यंकर कुलवृत्तांत

या ग्रंथाच्या पहिल्या भागात कुलवृत्तांताचे महत्त्व, उपयुक्तता आणि आवश्यकता या विषयी सविस्तरपणे ऊहापोह करून तपशीलवार माहिती दिली आहे. चित्पावन अभ्यंकर कुलवृत्तांताच्या दुसऱ्या भागात खालील चार विषयांविषयी माहिती देत आहोत-

१) अभ्यंकर कुलाची सामान्य माहिती.

२) चित्पावन अभ्यंकर कुलातील मुख्य घराणी आणि त्यांची कोकणातील मूळ गावे दाखविणारे रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्याचे नकाशे तसेच गोवा प्रांताचा नकाशा.

३) अभ्यंकर घराण्याच्या वंशावळी आणि व्यक्तिपरिचय, या विषयीची रचना, टीपा, व बोधचिन्हे. इत्यादि.

४) अभ्यंकर घराण्यांतील (पोट घराण्यासह) वंशावळी व त्यांतील व्यक्तिंचा परिचय.

**१) अभ्यंकर कुलाची सामान्य माहिती–**

अ) **कुलनाम–कोकणस्थ** चित्पावन ब्राह्मणांच्या मूळ ६० आडनावांमधे अभ्यंकर हे पहिलेच आडनाव आहे. अभ्यंकर हे आडनाव कसे पडले याबद्दल निश्चित माहिती मिळाली नाही. तथापि चित्पावन ब्राह्मणातील इतर आडनावांप्रमाणेच 'अभ्यंकर' या आडनावाविषयी कै. रावबहादूर ना. गो. चापेकर आपल्यां चित्पावन २री आवृत्ती, शके १८८८ (पान ७२ वर) म्हणतात—"अभ्यंकर हा संस्कृत शब्द असावा. अभयंकर म्हणजे अभ्यंकर. म्हणजेच अभय, निर्भय करणारा तो अभ्यंकर. देवांना अभ्यंगस्नान घालणारे ते अभ्यंगकर म्हणजेच अभ्यंकर."ही व्युत्पत्तीही संभवनीय आहे.

आम्हांला वरील दुसरी व्युत्पत्ती जास्त संयुक्तिक वाटते. कारण डॉ. द. वि. जोग मुंबई यांनी "कोकणस्थांची कुळकथा चिती यज्ञप्रक्रियेने मान्यता पावलेले म्हणून चित्पावन" या संशोधनपर लेखात चित्पावन आणि त्यातील आडनावाविषयीं विवेचन केले आहे. त्यात चित्पावनातील आडनावे ही चिती म्हणजे यज्ञ, याविषयी करावयाच्या कार्यावरून रूढ झाली. कर्तृत्व, अधिकार, सन्मान पदवी यांच्यावर आधारलेली गौरव नावेच माणसांना प्रिय असतात आणि म्हणून ती शतकानुशतके चालू रहातात. पूर्वीच्या काळी यज्ञाच्या वेळी अभ्यंगस्नान घालणारे किंवा त्याची व्यवस्था पहाणारे ते अभ्यंगकर. त्याचेच पुढे अभ्यंकर हे आडनाव रूढ झाले असावे, असें म्हटले आहे.

अभ्यंकर यांचे गोत्र वासिष्ठ आणि प्रवर ३. ते तीन प्रवर असे आहेत—१) वासिष्ठ २) इंद्रप्रमदा व ३) भरद्वसु. सर्व अभ्यंकर बंधू संध्येच्या अभिवादनांत 'वासिष्ठेंद्रप्रमदाभरद्वस्वेति त्रिप्रवरान्वित वासिष्ठगोत्रोत्पन्नोऽऽहं यजुर्वेदस्य तैत्तिरीय शाखांतर्गत हिरण्यकेशी शाखाध्यायी अमुक शर्माऽहं भो गुरोः अभिवादयामि" असा स्वतःचा उल्लेख करतात व स्वतःस आपस्तंबी म्हणवितात !

अभ्यंकर आडनावात नगरकर, काशीकर, मधुमते, महाबळ, कार्लेकर, तिरडे किंवा तिरडेकर तसेच नातू, दिवेकर अशा आडनावांचे लोक येतात. 'परंतू नातू अभ्यंकर नव्हेत' अशी नोंद नातू कुलवृत्तांतात आढळते. कांही इतर आडनावांच्या लोकांप्रमाणे अभ्यंकरही गुहागरहून पुढे दक्षिणेकडे वसतीस गेले असे म्हणतात. परंतु गुहागर येथे अभ्यंकर आडनावांचे बंधू आढळत नाहीत. ते विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यात मालगुंड, कुर्धे, पावस, गावडे-आंबेरे, केळे-मजगाव, रत्नागिरी, राजापूर-कोंढे, नारिंग्रे, हिंदळे, मालवण, रेडी-शिरोडा, आरोस इ. ठिकाणी आणि गोव्यात आंबेडे ता. सत्तरी येथे आढळतात. वरील ठिकाणी त्यांची वस्ती शिवकालापूर्वीपासून म्हणजे सन १६३०च्या पूर्वीपासून असल्याचे समजते. वरील मूळ [illegible]हून महाराष्ट्रात देशावर पुणे, सातारा, वाई, अवसरी, कोल्हापूर, सांगली, भोर संस्थानात पाली, जांभुळ[illegible]यगड जिल्ह्यात दिवेआगर, सासवणे, आवास, अलिबाग, इ. ठिकाणी तसेच महाराष्ट्राबाहेर, उत्तर[illegible] प्रांतात झांशी, जबलपूर, नागपूर, उज्जैन, महू, देवास, इंदूर, इ.

पूर्वीच्या संस्थानांत १८व्या व १९व्या शतकात स्थायिक झाल्याचे आढळते. गेल्या ४०-५० वर्षात काही अभ्यंकर बंधू परदेशातही युरोप, इंग्लंड, कॅनडा, अमेरिका, इ. देशांत स्थायिक झालेले दिसून येतात. कालांतराने त्यांनाही कदाचित् आपल्या मूळ स्थानाचे विस्मरण होईल म्हणून पुढील पिढ्यांना माहिती व्हावी हाही या कुलवृत्तांताचा उद्देश आहे.

अभ्यंकर कुलवृत्तांत प्रथमच तयार होत असल्यामुळे त्यात केवळ चित्पावन कोकणस्थ वासिष्ठ गोत्री अभ्यंकर आडनाव लावणाऱ्या कुटुंबाचीच माहिती गेली तीन-साडे तीन वर्षे गोळा करून समाविष्ट केली आहे. त्यात पूर्वी मधुमते, महाबळ, तिरडे नाव लावणारे परंतु सध्या अभ्यंकर आडनाव लावणाऱ्या बंधूंची माहिती आली असून तिचाही समावेश केला आहे. अभ्यंकरांप्रमाणेच कालांतराने नगरकर, महाबळ, कार्लेकर, मधुमते इ. आडनाव लावणाऱ्या बंधूंची (पूर्वीच्या अभ्यंकरांची) माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि कार्लेकर यांनी माहिती गोळा करून स्वतंत्र ग्रंथ प्रकाशित करण्याचा मनोदय कळविला. नातू यांचा कुलवृत्तांत याआधीच प्रसिद्ध झाला आहे. शिवाय इतरांकडून फारच अल्प प्रतिसाद मिळाला. त्यामुळे या ग्रंथामधे बहुतकरून सर्व अभ्यंकरांचीच माहिती समाविष्ट केली आहे. शिवाय काही नगरकर यांची माहिती दिली आहे. खरे पहाता महाबळ, मधुमते, कार्लेकर, इत्यादि सर्व आडनावांची माहिती गोळा करून तीही प्रसिद्ध होणे जरूर आहे. परंतु ते आम्हांस सध्या शक्य नसल्यामुळे त्याविषयी कुणीतरी पुढाकार घेऊन उर्वरित कार्य पूर्ण करील अशी आम्ही उमेद बाळगून आहोत.

**ब) चित्पावन अभ्यंकर कुलांतील मंडळींचे स्वभाव व गुणदोष इ.**—चित्पावन कोकणस्थ मंडळींच्या गुणदोषांचे वर्णन अनेक जणांनी केलेले आढळते. चित्पावन अभ्यंकर कुलातील लोक त्या गुणदोषांस अपवाद नाहीत. तथापि त्यांच्या स्वभावातील जी काही वैशिष्ठ्ये आहेत ती या ठिकाणी सांगणे अप्रस्तुत होणार नाही.

**पहिले वैशिष्ठ्य** म्हणजे अभ्यंकर घराण्यातील व्यक्ति या तापट, रागीट, शीघ्रकोपी, व अन्यायाविरूद्ध किंवा मनाविरूद्ध घडणाऱ्या गोष्टीबाबत चिडून उठणाऱ्या आढळतात. परंतु अंतर्यामी त्या कोमल हृदयाच्या आढळतात. त्याचप्रमाणे तुटकपणे किंवा अलिप्ततेने रहाणाऱ्या प्रवृत्तीच्या दिसतात.

**दुसरे वैशिष्ठ्य** म्हणजे अभ्यंकर कुलातील व्यक्ति ह्या बुद्धिमान्, व्यासंगी, महत्त्वाकांक्षी व कुठल्याही क्षेत्रात पाऊल टाकून त्यात पारंगतता प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या दिसतात. शास्त्री, पंडित, प्राध्यापक,—शिक्षक, सिने—नाट्य कलावंत, सरकारी नोकरीत शासनाधिकारी, वकील, डॉक्टर, आर्किटेक्ट, संगीतकार इ. विविध क्षेत्रात नाव कमावणाऱ्या अभ्यंकर बंधूंची वाण दिसत नाही. अशा अनेक दिवंगत आणि विद्यमान व्यक्ति सांगता येतील. उदाहरणार्थ :— नागपूरचे देशभक्त पुढारी कै. नरकेसरी बॅरिस्टर मोरोपंत अभ्यंकर, पुण्याचे निष्ठावंत समाज कार्यकर्ते कै. नरहर गोविंद तथा भाऊराव अभ्यंकर, पुण्याचे प्रसिद्ध कलाकार व सिनेकलावंत कै. गणेश भास्कर तथा मा. विवेक अभ्यंकर, सातारा- पुणे येथील संस्कृत पंडित पिता-पुत्र कै. महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री आणि काशीनाथशास्त्री अभ्यंकर, माहीम (मुंबई) चे कुशाग्र बुद्धिचे संशोधक, उद्योजक आणि दानशूर कै. गोपाळराव तथा दादासाहेब अभ्यंकर, अविरत श्रमाने लोखंड व सिमेंट उद्योगात व्यापार करणारे बडोद्याचे कै. अप्पासाहेब तथा गोविंद कृष्णाजी अभ्यंकर, दुसऱ्या महायुद्धात वैद्यकीय सेवेसाठी आघाडीवर जाणारे डॉ. शरदचंद्र लक्ष्मण अभ्यंकर, कॉमन वेल्थ इन्शुरन्स कंपनी आणि इतर अनेक कंपन्यांचे संस्थापक, संचालक पुण्याचे कै. रामभाऊ अभ्यंकर, कुशाग्र बुद्धीचे अर्थतज्ञ आणि कुशल प्रशासक कै. नरहर गणेश अभ्यंकर, महात्मा गांधींचे कायदेविषयक सल्लागार आणि त्यांचे बरोबर राऊंड टेबल कॉन्फरन्स साठी गेलेले सांगलीचे कै. गणेश रघुनाथ अभ्यंकर, शीव (मुंबई) येथील आयुर्वेदिक हॉस्पिटलचे संस्थापक सदस्य वैद्यपंचानन कै. गणेश महादेव अभ्यंकर, माजी लोकप्रिय आमदार आणि सुप्रसिद्ध लेखिका कै. सौ. कुसुम अभ्यंकर (माहेरच्या दामले) तसेंच विदुषी कै. मैत्रेयी विनोद (वेणू अभ्यंकर) आणि सिने कलाकार कै. माई भिडे या अभ्यंकर कन्या, त्याचप्रमाणे विद्यमान संगीतज्ञ व आकाशवाणी कलाकार एस. के. अभ्यंकर, डोंबिवली, सतारवादक शंकर अभ्यंकर, माहिम, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विद्यमान सुप्रसिद्ध गणितज्ञ डॉ. श्रीराम शंकर अभ्यंकर, प्रथितयश हायकोर्ट जज्ज ना.ल. तथा बापूसाहेब अभ्यंकर, नागपूर, बुद्धिबळपटू पद्मश्री अनुपमा

अभ्यंकर, संस्कृत प्राध्यापिका डॉ. सौ. कमल अभ्यंकर, कुशल संघटक श्री. प्रल्हादजी सीताराम अभ्यंकर, औरंगाबाद इत्यादि.

**तिसरे वैशिष्ठ्य** असे की कांहीं घराण्यांतील बहुतेक सर्व व्यक्ति ह्या निर्व्यसनी, स्वच्छ चारित्र्याच्या, दीर्घायुषी आहेत. बहुतेक ७५ वर्षांचे पुढे ऐंशी ते शंभर वर्षापर्यंत आयुष्य लाभलेल्या व्यक्ति आढळतात. परंतु काही घराण्यात मात्र अल्पायुषी किंवा सरासरी आयुर्मानापेक्षा कमी आयुष्य लाभलेल्याही व्यक्ति दिसतात.

**क) अभ्यंकर कुलाची कुलदैवते** :- सर्व अभ्यंकर मंडळी गुहागर येथून पुढे दक्षिणेकडे सरकत सरकत निरनिराळ्या ठिकाणी वस्ती करून राहिली. त्यामुळे अभ्यंकर कुटुंबाकडून आलेल्या माहितीनुसार श्री व्याडेश्वर हा कुलदेव आणि आदिमाता दुर्गादेवी म्हणजेच जगन्माता योगेश्वरी म्हणजेच जोगेश्वरी ही मूळ कुलदैवते मानली जातात. ही योगेश्वरी ही श्रीक्षेत्र आंबेजोगाई येथील असून ही आपली कुलदेवी कशी याविषयी बऱ्याच दंतकथा आहेत. काहींच्या मते ही देवी मूळ कोंकणातील असून अनेक वर्षांचे मुसलमानी अंमलामुळे व त्यांच्या मूर्तीभंजक प्रवृत्तीमुळे या देवीचे स्थलांतर उत्तरेस बीड जिल्ह्यात आंबेजोगाई येथे झाले. तथापि त्या देवीला बरीच अभ्यंकर कुटुंबे, इतर चित्पावन ब्राह्मणांप्रमाणे आपले कुलदैवत मानतात. त्याचप्रमाणे विशेषतः राजापूरपासून मालवण, रेडी-शिरोड्यापर्यंत अभ्यंकर मंडळी कोल्हापूर म्हणजेच करवीर-निवासी महालक्ष्मी किंवा अंबाबाई ही कुलदेवी मानतात. तर काही जण तुळजापूरची श्रीभवानी देवी कुलदैवत मानतात. याशिवाय स्थानिक देवांना भजणे व त्याप्रमाणे नैवेद्य वगैरे अर्पण करण्याच्या प्रथेमुळे हल्लीच्या काही मंडळींकडून त्यांची नावे कुलदैवते म्हणून लिहून आली असावी. तरी त्या ग्रामदेवता असून कुलदेव व्याडेश्वर व कुलदेवता म्हणून आंबेजोगाईची योगेश्वरी किंवा जोगेश्वरी देवी किंवा कोल्हापूरची अंबाबाई म्हणजेच श्रीमहालक्ष्मी किंवा तुळजापूरची तुळजाभवानी याच होत.

**कुळाचार**—श्रीयोगेश्वरी ही अभ्यंकरांची मुख्य कुलदेवता. तिचें ध्यान मालगुंड घराण्यातील वेदमूर्ती जनूकाका अभ्यंकरांनी पुढील प्रमाणे दिलें आहे:—

देवीं भक्तजनप्रियां सुवदनां खड्गं च पात्रं तथा
स्वर्णालङ्कृतलाङ्गलं च मुसलं हस्ते दधानां श्रियम् ।
विद्युत्कोटिरवीन्दुकान्तिममलां दन्तासुरोन्मूलिनीं
ब्रह्मेन्द्राद्यभिवन्दितां च वरदां योगेश्वरीं तां भजे ॥

विभक्त कुटुंब पद्धतीमुळे व आईवडीलांचे कृपाछत्र लहानपणीच हरपल्यामुळे काही अभ्यंकर कुटुंबाकडून पूर्व परंपरागत कुळाचाराविषयी काही खास माहिती मिळाली नाही.

भाद्रपदातील मृण्मय गणपतीची पूजा, अश्विन प्रतिपदेपासून नवरात्रोत्सवात अखंड दीपमाळा, सप्तशतीचा पाठ, ब्राह्मण, सवाष्ण व कुमारिका यांना भोजन, अष्टमीस महालक्ष्मीची पूजा (घागरी फुंकणे), तसेच बोडण भरणे इत्यादि कुळाचार पाळले जातात. चित्पावन ब्राह्मणांतील काही कुळाचाराविषयी खास माहिती अन्यत्र दिली आहे.

**अभ्यंकर कुलांतील घराणी**

अभ्यंकर कुलातील मुख्य अशी जी घराणी धरली जातात त्यांना आणि त्यातील कुटुंबियांच्या स्थलांतरामुळे झालेल्या पोट घराण्यांनासुद्धा मूळ घराण्याचेच नाव आम्ही दिले आहे. ते नाव मुख्य घराण्याच्या मूळ वसतीस्थानाचे गांवाचे नावाने संबोधून त्यातील पोट घराण्याचेही तेच नाव असे मानले आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ज्या गांवी मूळ घराणी ३०० ते ५०० वर्षापूर्वी होती त्या गांवाचे नांवापुढें त्यातील कांही बंधूंनी दुसऱ्या गांवी स्थलांतर करून वसती केली असेल ते नांव पुढे जोडून पोट घराणी मूळ घराण्यात दाखविली आहेत. मूळ मुख्य घराणी खालीलप्रमाणे मानली आहेत-

१) मालगुंड, २) कुर्धे, ३) गावडे आंबेरे, ४) केळे-मजगाव, ५) नारिंग्रे, ६) राजापूर-कोंढे, ७) मालवण,

वरील प्रत्येक घराण्यांतील कुटुंबांची अनेक ठिकाणी स्थलांतरे झालेली आहेत व त्यामुळे प्रत्येकाची पोट घराणी झाली आहेत. त्यांची जेवढी व जशी माहिती उपलब्ध झाली तेवढी व तशी माहिती मुख्य घराण्यांच्या

सदराखालीच दिली आहे. काही घराण्यांचा संबंध कुठल्याच घराण्यांशी जोडता येत नाही. ती सुटी घराणी म्हणून शेवटी दर्शवली आहेत. त्याबाबत अधिक संशोधन होणे जरूर आहे. तसेच जी मूळ घराणी म्हणून सात घराणी दाखविली आहेत त्यांचीही जास्त माहिती मिळविणे जरूर आहे.

अभ्यंकरांचा कुलवृत्तांत प्रथमच तयार होत असल्यामुळे व तो जास्त परिपूर्ण करण्यात आणखी २/३ वर्षांचा कालावधी घालवल्यास तो प्रसिद्ध होण्यात अनिश्चितता व भीति असल्यामुळे आपल्या माहितीच्या आधारे मोठ्या कष्टाने सातत्याने अविरतपणे ३/३ ॥ वर्षे जी माहिती गोळा केली आहे, त्यावरून तो लवकरात लवकर प्रसिद्ध करावा या काहीं बंधूंच्या आग्रहामुळे जास्त संशोधनासाठी अधिक काळ देता आला नाही. तथापि भावी पिढ्यांतील उत्साही तरूण मंडळी यात रस घेऊन ते संशोधन करतील अशी रास्त अपेक्षा ठेवली आहे.

**३) अभ्यंकर घराण्यांची वंशावळी व व्यक्तिपरिचय, रचना, टीपा व बोधचिन्हे इत्यादि.**

या विभागातील व्यक्ति-परिचयात किंवा वंशावळीत काही चुकीची माहिती आढळल्यास ती संपादकाच्या ताबडतोब नजरेस आणावी अशी सर्व कुलबंधूंना नम्र विनंती आहे. या भागातील माहिती ही १९८७ पासून ३ वर्षात जमा केलेली आहे. ती शक्यतो अद्यावत् करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यानंतरच्या काळांतील घडामोडींची किंवा बदलाची माहिती बऱ्याच बंधूकडून आली नाही. म्हणून ती १ ।२ वर्षापूर्वीची काही बाबतीत असेल. या भागातील माहिती कशी वाचावी याबद्दलच्या टीपा व बोधचिन्हे खाली देत आहोत.

१) प्रत्येक वंशावळीस पुढीलप्रमाणे शीर्षक दिले आहे.

घराणे क्रमांक, घराण्याचे नाव, वंशावळी क्रमांक ज्या पुरुषापासून वंशावळी सुरू होते त्याचा व्यक्ति क्रमांक व नांव, वंशावळ क्रमांक व मूळ गांवाहून पुढें स्थलांतरे झालेली गांवें व मूळ पुरुषाचा अंदाजे कालखंड.

२) वंशावळीत फक्त पुरुष व्यक्तिंचीच नावे दिली आहेत. अगदी लहान मुलांची नावे वंशावळीत दाखविली नाहीत. परंतु त्यांची व स्त्रियांची म्हणजे भार्या व कन्या यांची नावे व्यक्तिपरिचयात दिली आहेत.

वंशावळी मांडताना जितके मागे जाता येईल तितके जाऊन घराण्याच्या मूळ पुरुषाची पिढी ही पिढी क्र. एक मांडली आहे. पुढे वंशविस्तार देताना त्याचा पुत्र ही दुसरी पिढी, नातू ही तिसरी पिढी अशा क्रमाने वरून खाली एकाखाली एक नाव अशा क्रमाने वरून शेवटपर्यंत दिली आहेत. पिता-पुत्राचे नाते उभ्या रेषेने जोडून दाखवले आहे. पुत्र अनेक असल्यास त्यांची नावे एकाच पिढीत आडव्या सरळ रेषेने दिली आहेत. व त्यात मिळालेल्या माहितीनुसार शक्यतो ज्येष्ठता क्रम अनुसरला आहे. पण तो बिनचूक असेलच असे नाही. व्यक्ति क्रमांक व माहिती देताना प्रथम ज्येष्ठ पुत्राचे नाव व त्याचा वंशविस्तार नंतर दुसऱ्या पुत्राचे नांव व त्याचा संपूर्ण वंशविस्तार असा क्रम ठेवला आहे.

३) ज्या वंशावळीत एकेकच पुरुष प्रत्येक पिढीत आहे त्या वंशावळीत मूळ पुरुषापासून पुढील पिढ्यांतील व्यक्तिंची नावे एका ओळीत उजवीकडून डावीकडे अशी दाखवून त्यापुढील पिढ्यांचा विस्तार वरून खाली याप्रमाणे दाखविला आहे.

४) वंशावळीत प्रथम डाव्या बाजूस पिढी क्र. दिला आहे. आणि त्या पिढीतील पुरुषांची नावे एका ओळीत दिली आहेत. प्रत्येक पुरुष व्यक्तिला व्यक्ति क्र. दिला आहे. आणि तो वंशावळीत त्याच्या नावामागे लगत दिला आहे. हे व्यक्ति क्रमांक त्या त्या वंशावळी पुरतेच दिले नसून घराण्यातील सर्व वंशावळीतील पुरुष संपेपर्यंत क्रमवार चालू ठेवले आहेत. घराणे संपले म्हणजे नव्या घराण्यातील व्यक्ति क्रमांक पुन्हा प्रथमपासून सुरू असा क्रम ठेवला आहे.

५) वंशावळीतील व्यक्ति हयात आहेत की मृत आहेत हे वंशावळीत चिन्हानी अगर 'ह' किंवा 'मृ' या अक्षरांनी दाखविण्याचे मुद्दाम टाळले आहे. व्यक्ति परिचयात मात्र व्यक्ति निश्चितपणे हयात किंवा मृत असल्याचे माहित असल्यास तसे दाखविले आहे. ज्या व्यक्तिबाबत हयात वा मृत माहित नसेल त्या त्या व्यक्तिच्या नावापुढे हयात किंवा मृत्यू तारीख किंवा मृत असे लिहिलेले नाही.

६) वंशावळीत व्यक्तिंची नावे देतांना मूळ अगर पाळण्यातले नाव दिले असून त्या व्यक्तिचे व्यवहारात

प्रचलित असलेले दुसरे नाव अगर टोपणनाव माहित असल्यास ते मूळ नावाबरोबर कंसात दिले आहे.

७) व्यक्ति दत्तक आली असल्यास वंशावळीत व्यक्तिचे नावापुढे (द. आ.) व दत्तक गेली असल्यास (द. गे.) अशी अक्षरे लिहिली आहेत.

८) व्यक्तिपरिचय देताना तो चरित्रवजा न देता अगदी त्रोटक स्वरूपात दिला आहे. एखाद्या व्यक्तिची विशेष माहिती लिहून आली असेल तर ती त्रोटक व सारांश रूपाने दिली आहे. त्रोटक परिचय देताना प्रथम व्यक्तिक्रमांक नंतर तिरकी उभी रेष, पिढी क्रमांक देऊन व्यक्तिचे नाव, वडिलांचे नाव, दत्तक आला असल्यास (द. आ.) अथवा दत्तक गेला असल्यास (द. गे.) असे लिहून पुढे जन्मतारीख किंवा साल (म्हणजे इ. सन) आणि/किंवा तिथी व शके, व्यक्ति मृत असल्यास मृत्यूच्या तारखा किंवा सन, शिक्षण, व्यवसाय किंवा नोकरी, छंद, आवड, विशेष प्राविण्य, परदेशगमन, इ. विषयींची उपलब्ध माहिती व मानसन्मानाच्या पदव्या, हुद्दे माहित असल्यास ते दिले आहेत. नंतर वास्तव्याचा पत्ता दिला आहे. नंतर भार्या, तिचे नाव, माहेरचे नाव व स्थळ व इतर विशेष माहिती नंतर कन्या, त्यांच्या जन्मतारखा, शिक्षण, विवाहित असल्यास सासरचे नाव व स्थळ इ. माहिती दिली आहे.

९) वंशावळीतील ज्या पुरुषांचा वंश पुढे चालू नाही अशा व्यक्तिच्या नावाखाली उभी रेष दाखवून ० (शून्य) अशी खूण केली आहे. जे अविवाहित मृत असतील त्यांचे नावापुढे अविवाहित मृत असे लिहिले आहे. जे हयात असून वयाने मोठे व अविवाहित आहेत त्यांच्या नावापुढे अविवाहित असे लिहिले आहे.

१०) ज्या व्यक्तिची नावापलिकडे काहीच माहिती उपलब्ध झाली नाही किंवा वारंवार विनंती करूनहि माहिती मिळाली नाही त्यांचे व्यक्ति क्रमांक व नाव देऊन पुढे # अशी खूण केली आहे.

११) पुरुष किंवा स्त्रियांचे नावामागे श्रीयुत, राजमान्य राजश्री किंवा सौभाग्यवती, कुमारी इ. उपाधी लिहिलेली नाही. वंशावळी व व्यक्तिपरिचय देताना खालीलप्रमाणे बोधचिन्हे वापरली आहेत :–

**i)** मृत–मृ.

**ii)** क्रमांक–क्र.

**iii)** व्यक्ति क्रमांक–व्य. क्र.

**iv)** पिढी क्रमांक–पि. क्र.

**v)** पुरुष अपत्य नसलेले– 

**vi)** माहिती मिळाली नाही– #

**vii)** माहेरचे नांव व स्थळ–माहेर

१२) अतुलनीय कर्तबगारी दाखविणाऱ्या काही विशेष महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती वेगळ्या ठिकाणी "अभ्यंकर कुलातील काही महत्त्वाच्या उल्लेखनीय व्यक्ति" या सदरात सविस्तरपणे लिहिली आहे.

दिनांक : १७ मार्च १९९१.
चैत्र शुद्ध १ शके १९१३. ठाणे.

डॉ. रा. म. अभ्यंकर.
अध्यक्ष
अभ्यंकर कुलवृत्तांत समिती.

# अभ्यंकर मंडळ (स्थापना: १९९२)

(रजि. क्र. एफ.२९८८२/ठाणे)

वेबसाईट: www.abhyankarmandal.com

द्वारा श्रीमती रेखा सुधाकर अभ्यंकर,

३,ओम गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था,

पं. राम मराठे बंगल्याजवळ, ठाणे(पूर्व)-४०००६३

## कार्यकारी मंडळ

## सन २०२१ ते २०२६ पर्यंत

| पद | नाव | वास्तव्य | मोबाइल नंबर |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | श्री निशिकांत शंकर अभ्यंकर | ठाणे | ९३२३७३८६३१ |
| उपाध्यक्ष | श्री नरेंद्र अनंत अभ्यंकर | विले पारले | ७७३८०९६७५४ |
| सचिव | श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर | कल्याण | ९०९६०८१६९३ |
| कोषाध्यक्ष | श्री अशोक विद्याधर अभ्यंकर | ठाणे | ९९६७३५८९३५ |
| कार्यकारी सदस्य (१) | श्रीमती रेखा सुधाकर अभ्यंकर | ठाणे | ०२२५३२३८५४ |
| कार्यकारी सदस्य )२( | श्री लिलाधर शंकर अभ्यंकर | ठाणे | ९२२३४११०२६ |
| कार्यकारी सदस्य )३( | विजय भास्कर अभ्यंकर | विरार | ९५०३१४३०५८ |
| कार्यकारी सदस्य )४( | संजय प्रभाकर अभ्यंकर | चेंबूर | ९८६९५३८४३५ |
| कार्यकारी सदस्य )५( | श्री दिलीप गणेश अभ्यंकर | बदलापूर | ९७७३१३५३३० |
| कार्यकारी सदस्य )६( | श्री विजय वामन अभ्यंकर | विले पारले | ९९६७४३४१८६ |
| कार्यकारी सदस्य )७( | श्री सचिन दिनकर अभ्यंकर | पुणे | ८०८७८७३१५० |
| कार्यकारी सदस्य )८( | सौ अलकनंदा .मेढेकर | विले पारले | ९८२१५४८७७६ |
| कार्यकारी सदस्य )९( | सौस्वप्ना गोखले . | मुलुंड | ९२२०७९३७९९ |
| कार्यकारी सदस्य १)०( | विनय सुधाकर अभ्यंकर | ठाणे | ८०८००५३८५४ |
| कार्यकारी सदस्य १)१( | श्री संदिप अभ्यंकर | बोरिवली | ९३२२९२५८५८ |
| स्वीकृत सदस्य (१) | सौअनिता विनय अभ्यंकर . | ठाणे | ८०८००५३८५३ |
| स्वीकृत सदस्य )२( | श्री पार्थ नरेंद्र अभ्यंकर | विले पारले | ८०८२५३९०१८ |
| स्वीकृत सदस्य )३( | श्री दीपांकर दिलीप अभ्यंकर | बदलापूर | ७५०७७१६३१९ |

# अभ्यंकर मंडळ (स्थापना: १९९२)

## (रजि. क्र. एफ.२९८८२/ठाणे)

### आयोजित केलेल्या कुलसंमेलनाबद्दल माहिती

| संमेलन | तारीख | ठिकाण |
|---|---|---|
| १ | १८ फेब्रुवारी १९९२ | ब्राह्मण सेवा संघ सभागृह, ठाणे |
| २ | १८ एप्रिल १९९३ | ब्राह्मण सेवा संघ सभागृह, ठाणे |
| ३ | २७ नोव्हेंबर १९९४ | ब्राह्मण सेवा संघ सभागृह, ठाणे |
| ४ | १५ ऑक्टोबर १९९५ | कलाप्रसाद कार्यालय, पुणे |
| ५ | २४ नोव्हेंबर १९९६ | ब्राह्मण सेवा संघ सभागृह, ठाणे |
| ६ | ३० नोव्हेंबर १९९७ | अभ्यंकर वाडा जांभुळपाडा, रायगढ |
| ७ | ०७ फेब्रुवारी १९९९ | ज्ञानप्रबोधिनी सभागृह, निगडी, पुणे |
| ८ | २१ नोव्हेंबर १९९९ | सुवर्णा हॉल सभागृह, ठाणे |
| ९ | १९ ऑक्टोबर २००० | ब्राह्मण सेवा संघ सभागृह, ठाणे |
| १० | २५ नोव्हेंबर २००१ | उमा निळकंठ व्यायाम शाळा सभागृह, ठाणे |
| ११ | १७ नोव्हेंबर २००२ | ज्ञानेश्वर कार्यालय सभागृह, डोंबिवली |
| १२ | १६ नोव्हेंबर २००३ | स्नेहबंध सभागृह, कानसळ, रायगढ |
| १३ | ०५ डिसेंबर २००४ | हिंदू सेवा संघ मामनोली, कल्याण |
| १४ | १३ नोव्हेंबर २००५ | श्री मधुकर यशवंत अभ्यंकर, सासवने, अलिबाग |
| १५ | १२ नोव्हेंबर २००६ | केशवसृष्टी  सभागृह, भाईंदर, ठाणे |
| १६ | १० फेब्रुवारी २००८ | भारतीय स्त्री जीवन विकास परिषद  सभागृह, ठाणे |
| १७ | ३० नोव्हेंबर २००८ | ज्ञानप्रबोधिनी सभागृह, निगडी, पुणे |
| १८ | ०१ नोव्हेंबर २००९ | जानकी मंगल कार्यालय, मालवण |
| १९ | २१ नोव्हेंबर २०१० | श्री गजानन महाराज मंदिर सभागृह, डहाणू |
| २० | १३ नोव्हेंबर २०११ | श्री उरुविला सभागृह, नागपूर |
| २१ | २५ नोव्हेंबर २०१२ | महाराष्ट्र चित्तपावन संघ-गद्रे मंगल कार्यालय, नाशिक |
| २२ | २४ नोव्हेंबर २०१३ | नामदेववाडी  सभागृह, ठाणे |

| | | |
|---|---|---|
| २३ | १६ नोव्हेंबर २०१४ | कोल्हटकर मंगल कार्यालय, अकोला |
| २४ | २९ नोव्हेंबर २०१५ | गणेश मंगल कार्यालय, गावडे अंबेरे |
| २५ | १३ नोव्हेंबर २०१६ | पांडुरंग मंगल कार्यालय, अंबेजोगाई |
| २६ | ०५ नोव्हेंबर २०१७ | ब्राह्मण सेवा संघ, चिपळूण |
| २७ | १८ नोव्हेंबर २०१८ | मातोश्री सभागृह, दहीवली, कर्जत |
| २८ | १० नोव्हेंबर २०१९ | चित्तपावन ब्राह्मण संघ गिरगांव, मुंबई |
| २९ | २५ डिसेंबर २०२१ | ब्राह्मण सभा, ठाणे |
| ३० | १३ नोव्हेंबर २०२२ | श्री सिद्धलक्ष्मी गणेश मंदिर, जांभुळपाडा |

## अभ्यंकर मंडळाचे देणगीदार सभासद

| | सभासदाचे नाव | देणगीची रक्कम |
|---|---|---|
| १ | मंगलाताई गोपाळराव अभ्यंकर | १,००,००० |
| २ | श्रीकृष्ण पी. अभ्यंकर | ३०,००० |
| ३ | चिंतमण रघुनाथ अभ्यंकर | २५,००० |
| ४ | शंकर के. अभ्यंकर | १२,००० |
| ५ | कमल शंकर अभ्यंकर | १२,००० |
| ६ | रामचंद्र नारायण अभ्यंकर | ११,१११ |
| ७ | विजय भास्कर अभ्यंकर | ११,१११ |
| ८ | आशुतोष गुणवंत अभ्यंकर | ११,००० |
| ९ | अशोक अभ्यंकर | ११,००० |
| १० | जयवंत जी. अभ्यंकर | १०,००० |
| ११ | नलिनी शंकर अभ्यंकर | १०,००० |
| १२ | स्नेहलता विवेकानंद अभ्यंकर | १०,००० |
| १३ | विजय वामन अभ्यंकर | १०,००० |
| १४ | वैभव विजय अभ्यंकर | १०,००० |
| १५ | विनय सुधाकर अभ्यंकर | १०,००० |
| १६ | सचिन स. अभ्यंकर | १०,००० |
| १७ | रवीद्र आर. अभ्यंकर | १०,००० |
| १८ | अविनाश अभ्यंकर | १०,००० |
| १९ | नरेंद्र अभ्यंकर | १०,००० |
| २० | वीणा नरेंद्र अभ्यंकर | १०,००० |
| २१ | परशुराम न. अभ्यंकर | १०,००० |
| २२ | सुधीर वि. अभ्यंकर | १०,००० |
| २३ | अविनाश वि. अभ्यंकर | १०,००० |
| २४ | प्रमोद ए. अभ्यंकर | १०,००० |
| २५ | आरती एस. कार्लेकर | १०,००० |
| २६ | मीना केतकर | १०,००० |
| २७ | अशोक विध्याधर अभ्यंकर | १०,००० |
| २८ | विवेकानंद दत्तात्रय अभ्यंकर | १०,००० |
| २९ | विजया र. अभ्यंकर | १०,००० |
| ३० | चिंतामणी र. अभ्यंकर | १०,००० |
| ३१ | श्रीमती शालिनी गोखले | १०,००० |
| ३२ | यशोधन लीलाधर अभ्यंकर | १०००० |
| ३३ | मनमोहन अभ्यंकर | १०,००० |

| | | |
|---|---|---|
| ३४ | रवीद्र जी. अभ्यंकर | ६,००० |
| ३५ | वासुदेव केशव अभ्यंकर | ५००१ |
| ३६ | लीलाधार शंकर अभ्यंकर | ५,००० |
| ३७ | सचिन दिनकर अभ्यंकर | ५००० |
| ३८ | विनायक अभ्यंकर | ५,००० |
| ३९ | विवेक गणेश अभ्यंकर | ५,००० |
| ४० | दिलीप कृष्णाजी अभ्यंकर | ५,००० |
| ४१ | विनायक गजानन अभ्यंकर | ५,००० |
| ४२ | चिंतामण अभ्यंकर | ५,००० |

*अभ्यंकर मंडळाच्या gharane.abhyankarmandal.com या वेबसाईटचा उपयोग आपली वैयक्तिक माहिती अद्ययावत करण्यासाठी कसा करावा या विषयी सविस्तर माहिती पत्रक*

| | |
|---|---|
| Step 1 | प्रथम गुगल मध्ये जाऊन सर्च इंजिनच्या बोक्स मध्ये *gharane.abhyankarmandal.com असे इंग्रजी मध्ये टाइप करावयाचे आहे.* |
| Step 2 | टाईप केल्यावर आपल्या "कंप्यूटर स्क्रिन वर" अनेक options दिसतील. त्यातील "कुलवृतांत" या option वर क्लिक करा. |
| Step 3 | आता आपणाला "अभ्यंकर कुलवृतांत" असे *निळ्या रंगात* दिसेल व त्याच्या शेजारी एक हिरव्या रंगाचे झाड दिसेल, असे आढळल्यास, समजावे की आपण "अभ्यंकर मंडळाचे" खूप मेहनत घेऊन तयार केलेले *"ई-कुलवृतांताचे"* योग्य ते पान उघडले आहे. |
| Step 4 | आता या "अभ्यंकर कुलवृतांत" च्या होम पेज वर आपल्याला "कुळा विषयी जाणून घ्या" असे दिसेल. त्याच्या खाली बॉक्स मध्ये "शोधा मराठी मध्ये टाईप करा" असे लिहिलेले आढळून येईल. त्याच बॉक्स मध्ये एक बाजूला मराठी "किबोर्ड" चे चित्र दिसेल त्यावर क्लिक केल्यावर आपण त्या किबोर्ड च्या साह्याने आपले नाव टाईप करु शकता. |
| Step 5 | जर आपण त्या बॉक्स मध्ये "विवेक" असे नाव टाईप केले तर आपणाला *हिरव्या रंगात* "Accept" असे दिसेल. आता या बटनावर क्लिक करायचे आहे. असे केल्यास, आपणाला *निळ्या रंगात* "शोधा" असे दिसेल, या वर क्लिक केल्यावर "कृपया थांबा" असे फिरते चक्र दिसेल. आता थोड्यावेळ थांबा... |
| Step 6 | थोड्या वेळाने आपण "विवेक" या नावाने "अभ्यंकर कुलवृतांतातील" विविध घराण्यांमध्ये या नावाचे "३०" Records आहेत असे दिसेल. |
| Step 7 | आता आपणला हिरव्या रंगात ज्या ज्या घराण्यांमध्ये "विवेक" या नावाने मंडळाच्या "प्राधिकृत पदाधिका-याने" data entry केली आहे त्या-त्या घराण्यांची नावे दिसतील:- उदा. "कुळ-अभ्यंकर-नगरकर १-१"; "कुळ:कुर्धे-१२"; "कुळ:कुर्धे-१७-१"; "कुळ:सासवणे-७" इत्यादि |
| Step 8 | आता आपण जर "कुळ:सासवणे-७" या वर क्लिक केल्यास "विवेक" या व्यक्तिची "वैयक्तिक माहिती, त्यांचा पत्ता तसेच लग्न झाले असल्यास त्यांच्या पत्नीची संपूर्ण माहिती (मंडळाला पाठवली असल्यास) दिसेल. |
| Step 9 | आता आपणाला www.abhyankarmandal.com या वेबसाईटवर "अभ्यंकर कुलवृतांतpdf" वर क्लिक करुन या कुळाच्या वंशवेली वर जाऊन आपली व आपल्या पूर्वजांची संपूर्ण माहिती शोधायची आहे. |
| Step 10 | लक्षात असू द्या "ई-अभ्यंकर कुलवृतांतामध्ये" अश्याच व्यक्तिंची माहिती समाविष्ट केली आहे (data entry केली आहे) जी सन १९९१ साली "अभ्यंकर कुलवृतांत पुस्तकात" प्रकाशित करण्यात आली आहे, तसेच ज्या कुलबंधु/माहेरवाशीणींनी त्यांची माहिती आम्हाला(मंडळाला) अद्ययावत करण्यासाठी पाठविली आहे, त्याचा समावेश या "ई-अभ्यंकर कुलवृतांतामध्ये" करण्यांत आला आहे. *नम्र विनंती आहे की आपण आपली संपूर्ण माहिती मंडळाचे अध्यक्ष/सचिव यांना ई-मेल/पोस्टाने/whattsapp च्या माध्यमातून त्वरित पाठवावी.* |

# मालगुंड घराणे

हे गांव रत्नागिरी जिल्ह्यात सुप्रसिद्ध गणपतिपुळे या स्थानाजवळ समुद्र किनारी आहे. सुप्रसिद्ध कवि केशवसुत यांचे हे जन्मगाव. या ठिकाणी दामले, केळकर या प्रमाणे अभ्यंकरांचे घर आहे. ते तिथे ग्रामोपाध्ये होते. सध्या मात्र एकच अभ्यंकर कुटुंब तिथे रहात आहे. पण त्याचा या मूळ घराण्याशी संबंध होता किंवा कसे ते अपु-या माहितीमुळे निश्चितपणे सांगता येत नाही. म्हणून त्यांचे घराणे क्र. २ दाखवून वंशावळी व व्यक्ति परिचय वेगळा दिला आहे. या घराण्याचा मूळ पुरुष काशीनाथभट्ट अभ्यंकर असून त्याला रामचंद्र व लक्ष्मण असे दोन पुत्र होते. रामचंद्र यास महादेव, काशीनाथ व बाळकृष्ण असे तीन पुत्र होते, व लक्ष्मण यांस गंगाधर हा एकच पुत्र होता. रामचंद्राचे वंशज पुढे उपजीविकेसाठी वाई, सातारा, पुणे, मुंबई, कोकणांत दिवे-आगर(हबसाण) इ. ठिकाणी वाढत गेले, तर लक्ष्मण यांचे वंशज नागपूर, वर्धा, जबलपुर, बिलासपूर अशा मध्यप्रांतात आजही आढळतात. या घराण्याचा वंशवृक्ष मोठा व विखुरलेला असल्यामुळे सोयीसाठी त्याचे भाग पाडून ज्यागावी पुढे वंश वाढत गेला त्याचे नाव मालगुंड नावापुढे लावून क्रमशः घराणे १,२ या प्रमाणे वंशावळी व त्या व्यक्तींची माहिती दिली आहे.

## वंशावळी क्रमांक १

## मालगुंड–पुणे–मुंबई

## मालगुंड--आंबवडे--वाई--मुंबई--सांगली

| पि. क्र. | व्य. क्र. |
|---|---|
| १ | १ काशीनाथ भट्ट (मूळपुरुष) |
| २ | २ रामचंद्र भट ; ३२८ लक्ष्मण (वंशावळी क्रमांक ४ पहा) |
| ३ | ३ महादेव ; १९ काशीनाथ (वंशावळी क्रमांक २ पहा) ; ३०१ बाळकृष्ण (वंशावळी क्रमांक ३ पहा) |
| ४ | ४ हरि |
| ५ | ५ महादेव |
| ६ | ६ गोविंद |
| ७ | ७ बंगळबापू ; ८ चिंतामणी ; १५ मनोहर |
| ८ | ९ भालचंद्र ; १२ वासुदेव ; १३ प्रभाकर ; १६ पुरूषोत्तम |
| ९ | १० जयंत ; ११ श्रीकृष्ण ; १४ आनंद ; १७ अनंत |
| १० | १८ हेरंब |

(७ बंगळबापू आणि १२ वासुदेव : ○)

---

## मालगुंड घराणे क्र. १

## वंशावळी क्र. २ (अ-ब)

## मालगुंड–वाई–पुणे–बदलापूर–दिवेआगर–मुंबई–ठाणे.

| पि. क्र. | व्य. क्र. |
|---|---|
| ३ | १९ काशीनाथ–रामचंद्रभट्ट–काशीनाथभट्ट |
| ४ | २० जनार्दन भट्ट(अ) |
| ५ | २१ विनायकशास्त्री |
| ६ | २२ नरसिंहभट्ट ; २३ गणेश भट |
| ७ | २४ नीलकंठ (अण्णंभट) |
|  | २५ मोरेश्वर ; २८ शंकर ; ३५ जनार्दन ; ४० परशुराम (भैया) ; ४१ गंगाधर |
| ९ | २६ श्रीकृष्ण ; २७ गदाधर (२५ मोरेश्वर यांचे) |
|  | ३६ शरद ; ३७ सुरेश (३५ जनार्दन यांचे) ; ४२ किरण ; ४४ प्रकाश ; ४५ माधव (४१ गंगाधर यांचे) |
| १० | २६(अ) सचिन ; २६(ब) अजित (२६ श्रीकृष्ण यांचे) |
|  | ३८ समीर ; ३९ अमीत (३७ सुरेश यांचे) ; ४३ भूषण (४२ किरण यांचे) |
| ९ | २९ अरविंद ; ३० नीळकंठ ; ३२ मधुकर ; ३४ प्रभाकर (२८ शंकर यांचे) |
| १० | ३१ गिरीश (३० नीळकंठ यांचे) ; ३३ आनंद (३२ मधुकर यांचे) |

वंशावळ क्र. २ (अ-ब) .

## मालगुंड-वाई-पुणे-बदलापूर-दिवेआगर-मुंबई-ठाणे

पि. क्र. व्य. क्र.

३ १९ काशीनाथ-रामचंद्रभट-काशीनाथभट्ट

४ २० जनार्दनभट्ट (आ)

६ २१ विनायकशास्त्री

६ २२ नरसिंहभट्ट ४६ जनार्दनभट

७ ४७ त्रिंबक ५९ विनायक (पृ.क्र. ११ पहा)

८ ४८ व्यंकूशास्त्री ५३ बाळकृष्ण (गोटू) ५७ वासुदेव (चिंगूदादा) ५८ भास्कर

९ ४९ भालचंद्र ५२ वामन ५४ शिवराम ५५ नारायण

१० ५० संजय ५१ चंद्रशेखर ५६ बाळू

---

## मालगुंड घराणे क्र. १

वंशावळ क्र. २ (अ-ब) .

### मालगुंड-वाई-पुणे-बदलापूर-दिवेआगर-मुंबई-ठाणे.

पि क्र. व्य.क्र.

३ १९ काशीनाथ-रामचंद्रभट-काशीनाथभट्ट.

४ २० जनार्दनभट्ट (अ)

५ २१ विनायकशास्त्री

६ २२ नरसिंहभट्ट ४६ जनार्दनभट

७ ५९ विनायक ७९ नरहर (पृ.क्र. १२ पहा)

८ ६० विष्णू (सोनू) ६९ हरि ७० काशीनाथ ७१ केशव ८० राजाराम ८८ रामचंद्र

९ ७२ परशुराम ७५ अच्युत ७७ सुरेश ७८ अनिल ८१ माधव ८३ चंद्रशेखर ८५ प्रभाकर

१० ७३ मिलिंद ७४ आनंद ७६ सुरेंद्र ८२ मुकुंद ८४ दिनेश ८६ प्रमोद ८७ अनिल

९ ६१ जनार्दन ६४ दिगंबर ६७ रामचंद्र ६८ काशीनाथ ८९ अरुण ९१ श्रीकांत ९३ हेमंत

१० ६२ वसंत ६५ दिनेश ९० यशोधन ९२ राहुल ९४ अजित

## मालगुंड घराणे क्रमांक १

### वंशावळ क्र.२ (अ-ब)

### मालगुंड–वाई–पुणे–बदलापूर–दिवेआगर–मुंबई–ठाणे.

पि. क्र. व्य. क्र.

३ १९ काशीनाथ– रामचंद्र– काशीनाथभट्ट

४ २० जनार्दनभट्ट (अं)

५ २१ विनायकशास्त्री

६ ४६ जनार्दन

७ ७९ नरहर ९५ पांडुरंग

८ ९६ सदाशीव १०५ सीताराम

९ ९७ दत्तात्रय ९९ लक्ष्मण १०१ पुरुषोत्तम

१० ९८ दिलीप १०० राजू १०२ प्रशांत १०३ प्रवीण १०४ प्रसाद

---

मालगुंड घराणे क्रमांक १

वंशावळ क्र.२ (अ-ब)

मालगुंड–वाई–पुणे–बदलापूर–दिवेआगर–मुंबई–ठाणे.

पि. क्र. व्य. क्र.

३ १९ काशीनाथ– रामचंद्र– काशीनाथभट्ट

४ २० जनार्दनभट्ट (अ)

५ २१ विनायकशास्त्री १२९ शिवराम (पृ.क्र. १४ पहा)

६ १०६ गंगाधरभट १२८ परशुरामभट (ब्रह्मीभूत)

७ १०७ सदाशीव (बाळंभट) ११९ कृष्णाजी (कुशाभाऊ)

८ १०८ सिद्धेश्वर १०९ त्रिंबक ११४ काशीनाथ ११५ नारायण

९ ११० विनायक, १११ प्रभाकर, ११२ विजय, ११३ जयंत | ११६ सदाशीव, ११७ परशुराम, ११८ अशोक (सोमनाथ), ११८(अ) सुधीर

८ १२० गंगाधर १२२ विद्याधर १२४ पराशर १२५ भार्गव १२६ अच्युत १२७ कुमार

९ १२१ पद्मनाभ १२३ पुरुषोत्तम

## मालगुंड घराणे क्र. १

### वंशावळ क्र. २ (अ-ब)

### मालगुंड-वाई-पुणे-बदलापूर-दिवेआगर-मुंबई-ठाणे.

पि. क्र. व्य. क्र.

३ १९ काशीनाथ- रामचंद्रभट- काशीनाथभट्ट

४ २० जनार्दनभट्ट (अ) १४३ सदाशीव (ब)

५ १२९ शिवराम १४४ लक्ष्मण

६ १३० धोंडभट

७ १३१ वामनभट

८ १३२ शिवराम १३६ काशीनाथ

९ १३३ विष्णू १३७ शंकर १४१ जनार्दन

१० १३४ रामचंद्र १३५ विनायक १३८ वामन १३९ विनायक १४० गोविंद १४२ गणपति

---

## मालगुंड घराणे क्रमांक १

### वंशावळी क्रमांक २ (क)

### वाई-दिवेआगर-पुणे.

पि. क्र. व्य.क्र.

४ १४५ गोविंद- काशिनाथभट- रामचंद्र- काशीनाथभट्ट

५ १४६ गजानन

६ १४७ हरि

७ १४८ शंकर(अण्णा)

८ १४९ विष्णू(बापू) १६० विश्वनाथ(राजाराम) १६५ नारायण

९ १५० गजानन(द.आ.) १६१ प्रभाकर(द.आ.)

१० १५१ दामोदर १५६ जनार्दन १५७ मधुकर १६२ प्रसाद १६३ श्रीपाद १६४ दिलीप

११ १५२ धनंजय १५३ विनायक १५४ जगदीश १५८ अविनाश १५९ गिरीश

१२ १५५ समर

(टीप :- क्र. १६६ ते १७२ दिलेले नाहीत)

## मालगुंड घराणे क्रमांक १
## वंशावळी क्रमांक २ (ड)
## आंबवडे-इंदूर-ग्वाल्हेर.

पि. क्र. व्य. क्र.

४ १७३विष्णू-काशीनाथभट्ट-रामचंद्रभट-काशीनाथभट्ट

५ १७४रामचंद्र १७८सखाराम १८४बाळकृष्ण १८५काशीनाथ

६ १७७गंगाधर १७९बळवंत १८० महादेव

७ १७६विष्णू १७७विठ्ठल ८१गणू १८२गोविंद १८३दत्तू

---

## मालगुंड घराणे क्रमांक १
## वंशावळी क्रमांक २ (इ)
## मालगुंड--वाई--डोंबिवली

पि. क्र. व्य. क्र.

४ १८६रघुनाथ– काशीनाथ– रामचंद्रभट– काशीनाथभट्ट

५ १८७त्रिंबक २०४विठ्ठल

६ १८८रामचंद्र १९८सिध्देश्वर २०३लक्ष्मण

७ १८९रघुनाथ १९०कृष्णशास्त्री १९९दत्तात्रय

८ १९१सीताराम २००महादेव

९ •१९२शंकर १९५गणेश २०१मोरेश्वर २०२सुभाष

१० १९३ प्रकाश
१९४ कृष्ण
१९६ गोविंद
१९७ भालचंद्र

## मालगुंड घराणे क्रमांक १
## वंशावळी क्रमांक २ (फ)
## मालगुंड – नागपूर – भंडारा – ठाणे – पुणे – धोराजी (गुजराथ)

पि. क्र. व्य. क्र.

४ २०५पांडुरंग–काशीनाथभट–रामचंद्रभट–काशीनाथभट्ट

५ २०६काशीनाथ

६ २०७सखाराम २२९लक्ष्मण

७ २०८विठ्ठल २१७विष्णू

८ २०९विश्वनाथ २११प्रभाकर २१५पद्माकर २१८रघुनाथ २२१गोविंद २२५शंकर २२८विनायक

९ २१०विलास २१२प्रकाश २१३अविनाश २१४ धनंजय | २१६प्रदीप २१९प्रकाश २२२रवींद्र २२३शिरीष २२४ नितिन | २२६दिलीप २२७अजित

१० २२० आनंद

## मालगुंड घराणे क्रमांक १
## वंशावळी क्र.२ (फ)
## मालगुंड–नागपूर–भंडारा–ठाणे–पुणे–धोराजी (गुजराथ)

पि. क्र. व्य. क्र.

४ २०५ पांडुरंग–काशीनाथ–रामचंद्रभट–काशीनाथभट

५ २०६काशीनाथ २४६नारायण २४७विश्वनाथ (बाळंभट)

६ २३०महादेव

७ २३१दत्तात्रय २४२ गोपाळ २४३ रामचंद्र

८ २३२प्रभाकर २३५वसंत २३७नारायण २४०मधुकर २४४गोविंद

९ २३३जयंत | २३६अशोक २३८अरुण | २४१सुधीर २४५अनिल

१० २३४प्रशांत | २३९प्रमोद |

## मालगुंड घराणे क्रमांक १

### वंशावळी क्रमांक २ (ग)

### मालगुंड–पुणे–ठाणे–वाई–सातारा



**मालगुंड घराणे क्र.१**

**वंशावळी क्र.२ (ग)**

**मालगुंड–पुणे–ठाणे–वाई–सातारा**



## मालगुंड घराणे क्रमांक १

### वंशावळी क्रमांक ४

### मालगुंड–वर्धा–नागपूर–बिलासपूर




## घराणे क्रमांक २

### मालगुंड–ठाणे–मुंबई



# कुर्धे घराणे

कुर्धे हा गाव रत्नागिरी जिल्ह्यात रत्नागिरीपासून २१ कि.मी. अंतरावर (पावस पासून अंदाजे ५ कि.मी.) रत्नागिरी–पूर्णगड या रस्त्यावर आहे. गावाची लोकसंख्या अंदाजे १५०० असून पूर्वी कुर्धे येथील मेरवीची वाडी होती. परंतु आता वेगळे गाव म्हणून समजतात. तथापि पोस्ट–ऑफिस मेरवी येथेच आहे. गावात फडके, बेहेरे, अभ्यंकर व जोशी अशी ब्राह्मणांची घरे आहेत. फडके कुल–वृत्तांतात (पृष्ठ १५०) म्हटल्याप्रमाणे हा गांव शके १४९० ते १५०० (इ.स. १५६८ ते १५७८) या दरम्यान कोणी अभ्यंकर व फडके या दोघा मामा–भाच्यांनी वसविला. हे अभ्यंकर व फडके अनुक्रमे मामा–भाचे जवळच्याच आगरगुळे गावी राहात होते. आगरगुळे, माडबंदगुळे व गावंढेगुळे गणेशगुळे या चार गावांचा मिळून आता गणेशगुळे हा मोठा गाव झाला आहे. त्या गावाचे दक्षिण हद्दीस लागूनच कुर्धे गावची वसाहत आहे. गांव ३ कि.मी. लांब व १ कि.मी. रुंद असून गावात बागायती व शेती हे प्रमुख व्यवसाय आहेत. गावात सर्वेश्वर आणि महाविष्णू यांची मंदिरे असून गोकुळाष्टमी व महाशिवरात्री हे दोन मोठे सण, उत्सव लोक साजरे करतात. कुर्ध्यास जाण्यासाठी हल्ली रत्नागिरी ते पूर्णगड जाणारी एस्.टी.बस गणेशगुळ्यातून कुर्धे गावातून महाविष्णूचे देवळावरून जाते. ती सोयीची आहे. महाविष्णू मंदिराचे एका बाजूस सर्व अभ्यंकर व दुसऱ्या बाजूस सर्व फडके यांची घरे आहेत. सध्या अभ्यंकर कुलातील पाच घराण्यांची घरे असून खालील कुलबंधूचे कुर्धे येथे वास्तव्य आहे.

(१) **खोत घराणे**–१) श्री. विश्वनाथ रघुनाथ अभ्यंकर २) श्री. अशोक दत्तात्रय अभ्यंकर ३) श्री. दिनकर सखाराम अभ्यंकर–मेरवी.

(२) **सावकार घराणे**–१) विष्णू गोविंद तथा दादा अभ्यंकर–वय ७५. २) विश्वनाथ दामोदर अभ्यंकर, पोलीस पाटील. ३) सुहास यशवंत अभ्यंकर

(३) **दीक्षित घराणे**–नरहर वासुदेव उर्फ बापू दीक्षित अभ्यंकर

(४) **भजू घराणे**–विनायक गणेश अभ्यंकर

(५) **मोरोपंत घराणे**–ह्या घरात शंकर लक्ष्मण अभ्यंकर, रा. पुणे हे अधूनमधून राहातात.

(६) **कुर्धे–यवत–मुंबई–पुणे–बडोदे घराणे**–हे खोत घराण्यापैकीच. यांची हल्ली वस्ती कुर्धे येथे नाही.

कुर्धे आपले मूळगांव म्हणून सांगणाऱ्या सध्या हयात असलेल्या व्यक्तींनी पुरविलेल्या माहितीवरून पुढील वंशावळी दिल्या असून त्यांतील व्यक्तींचा परिचय त्या त्या वंशावळी प्रमाणे पुढे दिला आहे.

## कुर्धे-खोत घराणे क्र.१
### वंशावळी क्र.१
### मुंबई-पुणे.

पि. क्र. व्य.क्र.

७ ७मोरेश्वर–६कानभट–५वामन–४विश्वनाथ–३गणेश–२विश्वनाथ–१हरभट

८ ८धोंडदेव

९ ९जनार्दन ३२वामन (पृ.क्र.५४ पहा)

१० १०सदाशिव १८अच्युत १९बाळाजी (बाबीकाका)

११ ११दत्तात्रय १६गोपाळ १७जगन्नाथ २०शंकर २८मधुसूदन

१२ १२अरविंद १४अशोक २१श्रीकांत २३गजानन २५आनंद २९अशोक ३१अनिल

१३ १३अविनाश १५हेमंत २२अभिर २४हर्षद २६बृहद २७पृथु ३०आशुतोष

---

## कुर्धे–खोत घराणे क्र.१
### वंशावळी क्र.१
### मुंबई–पुणे.

पि. क्र. व्य. क्र.

८ ८धोंडदेव–७मोरेश्वर–६कानभट–५वामन–४विश्वनाथ–३गणेश–२विश्वनाथ–१हरभट

९ ३२वामन

१० ३३काशीनाथ ५४गणेश

११ ३४अनंत ३५रघुनाथ ४८गोविंद ५५विनायक ५७विठ्ठल (पृ.क्र. ५५ पहा)

१२ ४९ कमलाकर ५१सुभाष ५३उमाकांत ५६श्रीपाद

१३ ५०विद्यानंद ५२राहुल

१२ ३६विश्वनाथ ४१दामोदर ४२दिवाकर ४३मोरेश्वर ४४श्रीधर ४५श्रीराम(रामचंद्र)

१३ ३७अनंत ३९आनंद ४०श्रीकृष्ण ४६संजय ४७विकास

१४ ३८विजय

## कुर्धे–मेरवी–खोत घराणे क्र.१
## कुर्धे–मेरवी--मुंबई–पुणे




## कुर्धे खोत घराणे क्र.२
## वंशावळी क्र.१
## कुर्धे-खोत-सोलापूर-पुणे घराणे



### कुर्धे खोत घराणे क्र.२
### वंशावळी क्र.१
### कुर्धे-खोत-सोलापूर-पुणे




### कुर्धे–खोत घराणे क्र.२
### वंशावळी क्र.२
### कुर्धे–सोलापूर–झरे.



# कुर्धे–खोत घराणे क्र.२

## वंशावळी क्र.२

## कुर्धे–सोलापूर–झरे.



## कुर्धे खोत घराणे क्र. २

### वंशावळी क्र.३

### कुर्धे--ठाणे--पुणे--सोलापूर

| पि. क्र. | व्य. क्र. |
|---|---|
| १ | १हरि |
| २ | २भास्कर |
| ३ | ३विठ्ठल |
| ४ | ४विष्णू, ८सोनोपंत (मूल नाही / no issue) |
| ५ | ५विश्वनाथ |
| ६ | ६शंकर |
| ७ | ७अशोक |

---

## कुर्धे खोत घराणे क्र. २

### वंशावळी क्रमांक ४

### कुर्धे–कल्याण

| पि. क्र. | व्य. क्र. |
|---|---|
| १ | १महादेव |
| २ | २कृष्णाजी |
| ३ | ३दत्तात्रय, ४राजाराम (द.गे.), ५महादेव |
| ४ | ६अनिल (५महादेव चे पुत्र) |

---

## कुर्धे-खोत घराणे क्र.२

### वंशावळी क्र. ५

### कुर्धे-कोल्हापूर-बेळगांव-टिटवाळा-मुंबई

| पि. क्र. | व्य. क्र. |
|---|---|
| १ | १गोपाळ |
| २ | २विष्णू |
| ३ | ३कृष्णा |
| ४ | ४वामन, ९शंकर, १५केशव (मूल नाही / no issue), १६गणेश, १८सीताराम, १९गंगाधर, २२श्रीपाद |
| ५ | ४वामन > ५माधव, ६शरद; ९शंकर > १०गोविंद (मूल नाही / no issue), ११मधुकर, १३रामचंद्र; १६गणेश > १७चिंतामण; १९गंगाधर > २०यशवंत, २१विश्वनाथ |
| ६ | ४वामन > ७शशिकांत, ८श्रीराम; ११मधुकर > १२महेश; १३रामचंद्र > १४रमेश |

## कुर्धे खोत घराणे क्र. ३
## कुर्धे-यवत-मुंबई-पुणे-बडोदे




## कुर्धे खोत घराणे क्र. ३
## कुर्धे-यवत-मुंबई-पुणे-बडोदे



## कुर्धे घराणे क्र.४

### कुर्धे–जांभुळपाडा--उद्धर–रामेश्वर--पाली घराणे




## कुर्धे घराणे क्र ५

### वंशावळी क्र. १

### कुर्धे–कान्होर–देवास–इंदूर–पुणे–मुंबई



कुधे घराण क्र ५

वंशावळी क्र. १

## कुर्धे–कान्होर–देवास–इंदूर–पुणे–मुंबई.




घराणे क्र. ५

वंशावळी क्र. २

## कुर्धे–देवास–इंदूर–हैद्राबाद--औरंगाबाद



## घराणे क्र. ६
## कुर्धे–मेरवी–सावकार घराणे
### कुर्धे--मेरवी--डोंबिवली

| पि. क्र. | व्य. क्र. |
|---|---|
| १ | १नारायण |
| २ | २भिकाजी |
| ३ | ३विसाजी |
| ४ | ४विश्वनाथ |
| ५ | ५नारायण |
| ६ | ६गोविंद, १२केशव, २२दामोदर |
| ७ | ७विष्णू, १०वामन, ११माधव, १३यशवंत, १९श्रीधर, २३विश्वनाथ |
| ८ | ८सुरेश, ९रामचंद्र, १४भालचंद्र, १६प्रकाश, १७सुहास, १८पुरूषोत्तम, २०शरच्चंद्र, २१अनिरुध्द |
| ९ | १५प्रसाद |

---

## घराणे क्र. ७
## कुर्धे–भजू घराणे

| पि. क्र. | व्य. क्र. |
|---|---|
| १ | १शिवराम |
| २ | २भास्कर |
| ३ | ३भिकाजी |
| ४ | ४गणेश |
| ५ | ५विनायक, ७दत्तात्रय |
| ६ | ६जयंत, ८विकास |

## घराणे क्र.८
## कुर्धे–मोरोपंत–घराणे
## कुर्धे–पुणे




## घराणे क्र. ९
## कुर्धे–नायगांव–पुणे



## घराणे क्र.१०

### कुर्धे–पुणे

| पि. क्र. | व्य. क्र. | |
|---|---|---|
| १ | १ बळवंत | |
| २ | २ अनंत | |
| ३ | ३ रघुनाथ | |
| ४ | ४ माधव | ५ मोरेश्वर |
| ५ | ○ | ६ माधव |

## कुर्धे घराणे क्र. ११

